एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, बुधवार ८ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-३४, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 34 Marathi - Daily - Mumbai, 8 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

आर्टेमिस-२ ने मोडला ५६ वर्षांपूर्वीचा विक्रम!

navakal.in

@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

## आर्टेमिस-२ ने अपोलोचा विक्रम मागे टाकला



**अमेरिकेची अवकाश संशोधन संस्था नासाच्या महत्त्वाकांक्षी आर्टेमिस-२ मोहिमेतील अंतराळवीरांनी अवकाशात पृथ्वीपासून सर्वाधिक दूर अंतरावर पोहोचण्याचा अपोलो-१३ यानाचा विक्रम मोडून आपल्या नावे नवा विक्रम स्थापित केला आहे.**

■ वॉशिंग्टन

**अपोलो-१३** ही मोहीम नासाने १९७० यशस्वी केली होती. या मोहिमेतील अंतराळवीरांनी पृथ्वीपासून २ लाख ४८ हजार ६५५ मैल अंतर गाठून मानवाने अवकाशात सर्वाधिक अंतर पार करण्याचा विक्रम प्रस्थापित केला होता. तेव्हापासून सुमारे ५६ वर्षे हा विक्रम अबाधित होता. सुमारे ५५ वर्षांनंतर नासाने आता आर्टेमिस -२ ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत चार अंतराळवीर चांद्र मोहिमेवर गेले आहेत. या मोहिमेतील ओरायन यानाने काल अवकाशात २ लाख ४८ हजार ६५५ » पान ७ वर

# इस्रायलची इराणींना धमकी! ट्रेनने प्रवास करू नका

# इराणचे प्रत्युत्तर! २० तास देतो! असा हल्ला करू की मध्ययुगात जाल

■ तेहरान

**इराणला** एका रात्रीत संपवू, अशी धमकी काल डोनाल्ड ट्रम्प यांनी दिल्यानंतर इराणनेही अमेरिकेला तेवढेच आक्रमक प्रत्युत्तर देताना म्हटले की, अमेरिका स्वतःचे अपयश लपवते आहे. त्यांच्या धमक्यांना आम्ही भीक घालत नाही. दुश्मनांची इच्छा कधीही पूर्ण होणार नाही. अमेरिकेला गंभीर परिणाम भोगावे लागतील. ट्रम्पकडे आता २० तासांचा अवधी आहे. आम्ही त्यांना पाषाण युगात पोहोचवू. इराणच्या उर्जा प्रकल्पाबाहेर मानवी साखळी तयार करण्याचे आवाहन आम्ही नागरिकांना करीत आहोत. आमचा अणुउर्जा कार्यक्रम आम्ही थांबवणार नाही. इराणच्या राष्ट्राध्यक्षासह १ कोटी ४० लाख इराणी स्वयंसेवक युद्धात त्यांचे प्राण देण्यासाठी तयार आहेत. इस्त्रायलनेही, इराणमधील लोकांनी रेल्वे प्रवास टाळावा. त्यांच्या जीवाला धोका असू शकतो, असे आवाहन केले आहे. हे आवाहन म्हणजे प्रत्यक्षात धमकीच आहे.



**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इराणला आज रात्रीपर्यंत माघार घेण्याची मुदत दिली. इराणच्या अणू प्रकल्पांवर हल्ला करून इराण नष्ट करण्याची धमकी दिली, इस्त्रायलने इराणींना इशारा दिला की, ट्रेनने प्रवास करू नका, आम्ही हल्ला करू, पण इराण डगमगला नाही. इराणने उलट अमेरिका व इस्त्रायलला सुनावले की लाखो इराणी आमच्या अणू प्रकल्पाभोवती मानवी साखळी करणार आहेत, तुम्हाला जे करायचे ते करा. इराणने ट्रम्प यांनाही धमकी दिली की तुम्हाला २० तासांची मुदत देतो, त्यानंतर असा हल्ला करू की अमेरिका पाषाण युगात पोहोचेल. या धमक्यांमुळे पुढील ४८ तासांत काय होईल याची चिंता वाटू लागली आहे.**

आखाती युद्धात मध्यस्थी देशांनी काल इराणला ४५ दिवसांचा युद्धबंदीचा प्रस्ताव दिला होता. तो इराणने कालच फेटाळत तात्पुरत्या किंवा कायमस्वरूपी परिस्थितीत होर्मुज सामुद्रधुनी उघडणार नाही, असे म्हटले होते. त्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पत्रकार परिषद घेऊन इराणला धमकी दिल्यानंतरही इराणने आपला सूर अजिबात बदलला नाही. प्राण गेले तरी लढण्याचा ठाम निर्धार इराणने केला आहे. या पार्श्वभूमीवर इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान आज म्हणाले की, १.४० कोटींहून अधिक इराणी नागरिकांनी आपल्या प्राणांचे बलिदान देण्याची तयारी दर्शवली आहे. मी स्वतः पूर्वी तयार होतो, मी आताही तयार आहे. इराणसाठी माझ्या प्राणांचे बलिदान देण्यास मी यापुढेही तयार राहीन.

ट्रम्प यांच्या धमकीच्या पार्श्वभूमीवर इराणच्या सरकारने नागरिकांना, विशेषतः इराणी तरुणांना, ठरलेल्या वेळी देशातील वीज प्रकल्पांजवळ जमण्याचे आवाहन केले आहे. » पान ७ वर

### आज रात्री एक संस्कृती संपूर्ण नष्ट होईल

ट्रम्प यांनी आज सकाळी 'ट्रुथ सोशल' या प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट टाकली. त्यात म्हटले की, आज रात्री एक संस्कृती संपूर्ण नष्ट होईल, जी पुन्हा कधीही परत येणार नाही. असे घडावे अशी माझी इच्छा नाही, पण कदाचित ते घडेलच. मात्र आता संपूर्ण सत्तापालट झाला असून वेगळ्या, अधिक हुशार आणि कमी कट्टर विचारांचे वर्चस्व आहे, तेव्हा कदाचित काहीतरी क्रांतिकारक अद्‌भुत घडू शकेल. कुणास ठाऊक? जगाच्या प्रदीर्घ आणि गुंतागुंतीच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या क्षणांपैकी एक असलेल्या आज रात्री आपल्याला ते कळेल.

## थोडक्यात...

### बारामती पोटनिवडणुकीसाठी ६७ अर्जांचा विक्रमी पाऊस

**बारामती -** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर लागलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणूक ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत असतानाच प्रत्यक्षात मोठ्या संख्येने उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. सुनेत्रा पवार यांच्या विरोधात तब्बल ६७ अर्ज दाखल झाले आहेत. काही उमेदवारांनी दोन किंवा तीन अर्ज भरले आहेत. मात्र, प्रत्यक्षात ५८ उमेदवार अंतिम रिंगणात आहेत. यामध्ये प्रमुख पक्षांचे तसेच मोठ्या संख्येने अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे. यातील १४ उमेदवार पुणे जिल्ह्याबाहेरील आहे. या निवडणुकीत मुख्य लढत अजित पवार राष्ट्रवादीच्या उमेदवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि काँग्रेसचे आकाश मोरे यांच्यात आहे. अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ एप्रिल आहे.

### नाशिकमध्ये वृक्षतोडीला २८ एप्रिलपर्यंत स्थगिती

**नाशिक-** नाशिकमधील वृक्षतोडीला राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) २८ एप्रिलपर्यंत स्थगिती दिली आहे. तपोवनसह शहरातील विविध भागांतील वृक्षतोडीविरोधात पर्यावरणप्रेमींनी याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज झालेल्या सुनावणीत लवादाने महापालिका प्रशासनाला २८ एप्रिलपर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले असून त्यानंतर पुढील सुनावणी होणार आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील रस्ते रुंदीकरणाचे काम सुरू आहे. यासाठी अनेक झाडांचे सर्वेक्षण करून ती तोडण्याचा निर्णय महापालिकेकडून घेण्यात आला होता.

### द्रमुक आणि अण्णाद्रमुकमध्ये अटीतटीचा सामना होणार

**चेन्नई -** तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत द्रमुकच्या (डीएमके) नेतृत्वाखाली आघाडी आणि अण्णाद्रमुकच्या (एआयएडीएमके) नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) यांच्यात अटीतटीचा सामना होईल, असा अंदाज मॅट्रिझ या संस्थेने केलेल्या मतदानपूर्व चाचणीतून वर्तवण्यात आला आहे. द्रमुकला १०२ ते ११५ जागा तर अण्णाद्रमुकला १०७ ते १२० जागा मिळतील असा अंदाज मॅट्रिझने वर्तवला आहे. तामिळी अभिनेता विजय याने स्थापन केलेल्या टिव्हीके या पक्षाला ५ ते १२ जागा मिळू शकतील, असा मॅट्रिझचा अंदाज आहे.

## २०२८ पर्यंत मेट्रो जाळे पूर्ण करणार मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

■ मुंबई

**मुंबईतील** मेट्रो प्रकल्पांना गती देत २०२८ पर्यंत संपूर्ण मेट्रो जाळे पूर्ण करण्याचा संकल्प असून वॉटर मेट्रोही लवकरच सुरू करण्याची घोषणा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. दहिसर ते मिरा-भाईंदर मेट्रो-९ मार्गिकेतील दहिसर ते काशीगाव या पहिल्या टप्प्याचे आज मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्याप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते.

त्यानंतर अंधेरी पश्चिम ते मंडाले मेट्रो-२बी मार्गिकेतील डायमंड गार्डन ते मंडाले या टप्प्याचे लोकार्पण, ठाणे-बोरिवली दुहेरी भुयारी मार्ग प्रकल्पाचा शुभारंभ आणि बीकेसीसाठी पॉड टॅक्सी प्रकल्पाचे ई-भूमिपूजन



फडणवीस आणि एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांनी भाषणे केली. पण सुनेत्रा पवार यांनी एकाही ठिकाणी भाषण केले नाही.

मेट्रो-९ ही दहिसर ते काशीगाव दरम्यान धावणार असून ती मेट्रो-७ ला जोडली गेल्याने प्रवाशांना थेट अंधेरीपर्यंत प्रवास करता येणार आहे. दरम्यान, या मेट्रो उद्घाटनावेळी स्थानिक नागरिकांनी स्थानकाच्या नावाबाबत नाराजी व्यक्त करत काळे झेंडे दाखवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी काहींना ताब्यात घेतले. तर मुंबईच्या महापौर रितू तावडे आणि नगरसेवकांना मेट्रो स्थानकाच्या गेटवर पोहोचताच पोलिसांनी अडवले. संतापलेल्या नगरसेवकांनी पोलिसांशी वाद घातला यामुळे मोठा गोंधळ उडाला होता.

तर मेट्रो-२बी मार्गिका डी.एन. नगर, बीकेसी, कुर्ला, चेंबूर आणि मंडाले या भागांना जोडणार असून लाखो प्रवाशांना » पान ७ वर

### मुंबईत विकासकामांचा धडाका

## पार्थ पवारांना कृतघ्न म्हणत काँग्रेसची बोचरी टीका! सुप्रिया सुळे यांचाही टोला



■ पुणे

**बारामतीमध्ये** सुनेत्रा पवार यांच्या विरोधात काँग्रेसने उमेदवार दिल्याने पार्थ पवार यांनी संताप व्यक्त केला होता. त्यावरून शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी काँग्रेसची पाठराखण केली. तसेच लोकशाहीत प्रत्येकाला मत मांडण्याचा अधिकार असला तरी मर्यादांचे भान हवे, असे म्हणत त्यांनी पार्थ पवार यांच्यावर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला. तर काँग्रेसने अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून पार्थ पवारांचा 'कृतघ्न' असा उल्लेख करत अत्यंत बोचरी टीका केली आहे. यामुळे बारामतीतील राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे.

काँग्रेसने पोस्टमध्ये म्हटले आहे की, धड भाषणही देता न येणाऱ्या, कुटुंबियांच्या पुर्वपुण्याईवर आताच खासदार झालेल्या मुलाने काँग्रेस पक्षाच्या डाऊनफॉल बद्दल बोलणं, म्हणजे जरा जास्तच नाही का झालं? स्वतःच्या वडिलांच्या संशयास्पद अपघाती मृत्यूनंतर लगेच जमीन घोटाळ्यातील चौकशीतून बचावासाठी राजकीय सोय म्हणून शांत राहणाऱ्या, महाशक्तिसमोर सरेंडर झालेल्या या कृतघ्न मुलाने काँग्रेस पक्षाबद्दल न बोललेलंच बरं राहील. या मुलाच्या वडिलांना न्याय मिळवून देण्यासाठी कर्नाटक सरकारने त्यांच्या राज्यात एफआयआर नोंद करून घेतला, तिथे सरकार काँग्रेस पक्षाचे आहे, काँग्रेस पक्षाचेच बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतील अधिकृत उमेदवार त्या संशयास्पद अपघाताचा महाराष्ट्रात गुन्हा नोंद करा, निवडणुकीतून माघार घेईल, अशी मागणी करत आहेत. यावरही या कृतघ्न मुलाने बोलायला हवे. काँग्रेस हा एक मोठा आणि स्वतंत्र राजकीय पक्ष आहे. निवडणूक लढवण्याबाबत निर्णय घेणे हा त्यांचा अधिकार आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक निवडणुकीत कुणीतरी विरोधात लढणारच, हे गृहीत धरूनच रिंगणात उतरावे » पान ७ वर

## कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्या शिक्षकांचे रास्ता रोको आंदोलन

■ मुंबई

**आझाद** मैदान परिसरात समग्र शिक्षण अभियानातील शिक्षकांनी कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याच्या मागणीसाठी रास्ता रोको आंदोलन केले. गेल्या महिनाभरापासून आझाद मैदानात आंदोलन सुरू असतानाही शासनाकडून दखल न घेतल्याने आज संतप्त शिक्षक थेट रस्त्यावर उतरले होते.

या आंदोलनामुळे परिसरात काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलनादरम्यान शिक्षकांनी जोरदार घोषणाबाजी केली. काही शिक्षक प्रतिनिधींनी सह्याद्री अतिथीगृहाबाहेर थांबून शिक्षणमंत्री तसेच संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेण्याचाही प्रयत्न केला.

आंदोलक शिक्षकांनी सांगितले की, २००७ पासून कंत्राटी तत्त्वावर अत्यल्प मानधनावर काम करत आहोत. आम्हाला लवकरात लवकर कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे आणि शासनाच्या सर्व सुविधा द्याव्या अशी शिक्षकांची मागणी आहे.

## एअर इंडिया'चे सीईओ कॅम्पबेल विल्सनचा राजीनामा



■ नवी दिल्ली

**एअर** इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) कॅम्पबेल विल्सन यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. कॅम्पबेल विल्सन यांची पाच वर्षांच्या करारावर नियुक्ती करण्यात आली होती. एअर इंडियाचे सीईओ म्हणून त्यांचा कार्यकाळ जुलै २०२७ मध्ये संपणार होता. त्याच्या वर्षभर आधीच त्यांनी राजीनामा दिला. एअर इंडिया सध्या आर्थिक आव्हानांचा सामना करत असतानाच त्यांनी राजीनामा दिल्याने चर्चा होत आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत विल्सन यांचा राजीनामा स्वीकारण्यात आला.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

मात्र, नेतृत्वातील बदल सुरळीत व्हावा यासाठी, नवीन सीईओची नियुक्ती होईपर्यंत त्यांना आपल्या पदावर राहण्यास कंपनीने सांगितले आहे. विल्सन यांची २०२२ मध्ये एअर इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती झाली होती.

विमान वाहतूक क्षेत्रातील ३० वर्षांहून अधिक समृद्ध अनुभव असलेल्या विल्सन यांनी फुल-सर्व्हिस तसेच लो-कॉस्ट एअरलाईन्समध्ये काम केले आहे. एअर इंडियात येण्यापूर्वी, त्यांनी स्कूट या सिंगापूर एअर लाईन्सच्या पूर्ण मालकीच्या लो-कॉस्ट उपकंपनीचे सीईओ म्हणून काम पाहिले होते.

## सरकारकडे कोट्यवधींची थकबाकी कंत्राटदारांचे अखेर कामबंद आंदोलन

■ मुंबई

**राज्यातील** कंत्राटदारांची प्रचंड थकबाकी वाढल्याने महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना आणि राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनांनी आजपासून कामबंद आंदोलन सुरू केले. संघटनांच्या म्हणण्यानुसार, मागील वर्षीचे १ लाख १६ हजार ५०० कोटी रुपये आणि चालू वर्षातील ९६ हजार ४०० कोटी रुपये अशी मोठी रक्कम सरकारकडे थकीत आहे. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे वारंवार चर्चेसाठी वेळ मागूनही केवळ बैठका आणि आश्वासने मिळाल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील सर्व विभागांतील विकासकामे आजपासून १५ एप्रिलपर्यंत टप्प्याटप्प्याने बंद करण्यात येणार असल्याचा इशारा कंत्राटदार संघटनांनी दिला.

महाराष्ट्र कंत्राटदार महासंघाचे कार्याध्यक्ष संजय महिंद म्हणाले की, मागील दोन-तीन वर्षांपासून राज्यातील कंत्राटदारांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, जलजीवन मिशन आणि ग्रामविकास विभागांतर्गत विविध विकासकामे » पान ७ वर

**भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी तपास करणाऱ्या एसआयटीची पहिली पत्रकार परिषद आज एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी घेतली. त्यांनी माहिती दिली की, अशोक खरातवर एकूण १२ गुन्हे दाखल आहेत. त्यातील महिला अत्याचाराचे ८ आणि आर्थिक फसवणुकीचे ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणाच्या तपासासाठी आतापर्यंत ३० साक्षीदार तपासले आहेत. या प्रकरणी सहा आरोपींना अटकदेखील करण्यात आलेली आहे.**

## खरात प्रकरणी १२ गुन्हे ३० साक्षीदार तपासले

■ नाशिक

### एसआयटीची माहिती

**एसआयटी** प्रमुख तेजस्वी सातपुते म्हणाल्या की, अशोक खरातवर एकूण १२ गुन्हे दाखल आहेत. त्यातील महिला अत्याचाराचे ८ आणि आर्थिक फसवणुकीचे ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर नाशिकच्या सिन्नर तालुक्यातील



वावी पोलिसांत अशोक खरातने राजेंद्र जासूद आणि दिनेश परब याच्या विरोधात ५ कोटींच्या खंडणीचा गुन्हा दाखल केला होता, तर शिर्डी पोलिसांत अशोक खरातचा ऑफिस बॉय नीरज जाधव याच्याविरोधात एका महिलेने बनावट व्हिडीओ व्हायरल करायची धमकी दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे, याच दोन गुन्ह्यानंतर राज्य सरकारने एसआयटीची स्थापना केली आहे. विशेष तपास पथकात २४ जण आहेत. आजपर्यंतच्या » पान ७ वर

## अनिल अंबानी समूह कर्ज प्रकरण ७३ हजार कोटींचा महाघोटाळा

■ नवी दिल्ली

**'रिलायन्स** अनिल अंबानी समूहा'ने (आरएएजी) ७३,००६ कोटींचा बँक कर्ज घोटाळा केल्याचा खळबळजनक दावा केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या अहवालात केला आहे. 'रिलायन्स अनिल अंबानी समूहा'विरुद्ध दाखल सात प्रकरणांच्या चौकशीत हा कथित महाघोटाळा झाल्याचे आढळले आहे.

या प्रकरणात कंपनी व्यवस्थापनासोबत काही वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमताची शक्यतेचाही संशय व्यक्त करण्यात आला आहे. सीबीआयने फेब्रुवारी महिन्यात सर्वोच्च न्यायालयात हा अहवाल सादर केला होता. सध्या सातही प्रकरणांमध्ये तपास सुरू असून, संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी केली जात आहे. बँकांचे मोठ्या प्रमाणावर कर्ज बुडवण्यासाठी जाणूनबुजून दिवाळखोरी प्रक्रिया राबवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

## पाकिस्तानमध्ये तेल संकटाचा फटका! रात्री ८ नंतर बाजार बंद

■ इस्लामाबाद

**अमेरिका,** इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे जागतिक तेल संकट तीव्र झाले आहे. याचा मोठा फटका पाकिस्तानला बसत आहे. यामुळे पाकिस्तान सरकारने देशातील बाजारपेठा आणि शॉपिंग मॉल रात्री ८ वाजता बंद करण्याचे आदेश दिले आहेत. ऊर्जा बचतीच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले असून नागरिकांना रात्री लवकर घरी परतण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

होर्मुज सामुद्रधुनीतील तणावामुळे तेलपुरवठ्यावर परिणाम झाला असून इंधनाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. पाकिस्तान आधीच महागाईच्या संकटाचा सामना करत असताना या तेलवाढीने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. देशात अफगाणिस्तान सीमेवरील तणाव वाढत असतानाच पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्या धोरणांविरोधात जनतेत असंतोष वाढत आहे. पाकिस्तानमध्ये पेट्रोलच्या किमतीत मोठी वाढ झाली असून पेट्रोलचा दर प्रति लिटर सुमारे ४५८ पाकिस्तानी रुपयांपर्यंत पोहोचला होता. जनतेच्या रोषानंतर सरकारने दरात सुमारे ८० रुपयांनी कपात करत तो ३७८ रुपयांपर्यंत आणण्याचा प्रयत्न केला. डिझेलच्या किमतीतही मोठी वाढ झाली असून महागाईने सामान्य नागरिकांना मोठा फटका बसत आहे. वाढत्या कर्जाचा बोजा आणि आर्थिक दबावामुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था आधीच अडचणीत आहे.

# कल्याण- डोंबिवली स्थायी समिती सभापतीपदी सेनेचे मल्लेश शेट्टी

## शिक्षण समिती भाजपाच्या अभिजित थरवळ यांच्याकडे

■ कल्याण

**कल्याण** डोंबिवली पालिकेच्या तिजोरीच्या चाव्या अखेर शिंदे शिवसेनेच्या हातात आल्या आहेत. काल सोमवारी झालेल्या स्थायी समितीच्या सभापती पदाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे मल्लेश शेट्टी तर शिक्षण समिती सभापतीपदी भाजपचे अभिजीत थरवळ यांची बिनविरोध निवड झाली.शेट्टी यांना स्थायी समिती सभापतीपदी विराजमान होण्याचा मागील २५ वर्षात तिसऱ्यांदा मान मिळाला आहे.

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती आणि इतर विषय समित्यांच्या निवडणुका पार पडल्या. यावेळी पालिक आयुक्त अभिनव गोयल,अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे. पालिका सचिव बाळासाहेब चव्हाण उपस्थित होते. महिला आणि बाल कल्याण समितीच्या सभापतीपदी महायतीच्या सारिका जाधव यांची निवड झाली.स्थायी समिती, शिक्षण समिती, महिला आणि बालकल्याण समिती सभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया गुरुवारी करण्यात आली होती.

महायुतीतर्फे भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, शिवसेनेतर्फे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या सूचनांप्रमाणे शिवसेना शिंदे गटाचे गटनेते विश्वनाथ राणे, उपमहापौर राहुल दामले,भाजपचे गटनेते शशिकांत कांबळे यांनी स्थानिक पातळीवर विषय समित्यांचे उमेदवारीचे निर्णय घेतले.

# संकेश्वरी मिरचीला उच्चांकी दर शेतकऱ्याने चक्क वाटले पेढे

■ कोल्हापूर

**येथील** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आठवड्याच्या सौद्यात संकेश्वरी मिरचीला प्रति किलो तब्बल १९०० रुपये दर मिळाला. आतापर्यंतच्या इतिहासातील हा उच्चांकी दर असल्याचे खरेदीदार अडत व्यापारी व बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. एव्हढा दर मिळाल्यानंतर संबंधित शेतकऱ्याने चक्क पेढे वाटून आपला आनंद व्यक्त केला.

या बाजार समितीत तनवडी येथील शेतकरी शिवाप्पा गंगाप्पा आरबोळे यांनी येथील रोहित विजयकुमार मांडेकर यांच्या अडत दुकानात आपली संकेश्वरी मिरची सौद्याला आणली होती. मिरची व्यापारी राजन जाधन यांनी प्रति क्विंटल १,९०,००० रुपये म्हणजेच प्रति किलो १९०० दराने ती खरेदी केली. त्यामुळे आरबोळे यांनी पेढे वाटून आनंद व्यक्त केला.

# महावितरणच्या आर्थिक पुनर्रचनेला मंजुरी

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या (महावितरण) आर्थिक पुनर्रचनेला मंजुरी देण्यात आली.

या निर्णयानुसार, शासन हमी असलेल्या सुमारे ३२,६७९ कोटी रुपयांच्या कर्जासाठी भांडवली बाजारात सरकारी रोखे (बॉण्ड्स) जारी करण्यात येणार आहेत. यामुळे कंपनीवरील आर्थिक ताण कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच महावितरणच्या कृषी वितरण व्यवसायाचे विभाजन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. या बदलामुळे



वितरण व्यवस्थेत अधिक पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवण्याचा उद्देश असल्याचे सांगण्यात येत आहे. याशिवाय, महावितरण कंपनीला भांडवली बाजारात सूचीबद्ध (लिस्टेड) करण्याचाही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ऊर्जा विभागामार्फत हा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या निर्णयामुळे महावितरणच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी प्रित्यर्थ अखंड नाम जप यज्ञ सप्ताह

■ विरार

**परब्रम्ह** भगवान श्री स्वामी समर्थ महाराज व प.पु. गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे (प्रमुखः अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ -त्रंबकेश्वर) यांच्या कृपा-आशीर्वादाने अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ -त्रंबकेश्वर, श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यत्मिक विकास (दिंडोरी प्रणित) मार्ग जि. नाशिक, शाखा एक्स्पर्ट स्कूल सेवा केंद्र आणि कारगील सेवा केंद्र विरारच्या वतीने अखंड नाम जप यज्ञ सप्ताह गुरूवार९ एप्रिल ते बुधवार १५ एप्रिल या कालावधीत ओल्ड विवा महाविद्यालय मैदान, मंगलमूर्ती गणपती मंदिर जवळ, विरार (पश्चिम) येथे आयोजित करण्यात आला आहे.

सप्ताह कालावधीत श्री स्वामी समर्थ महाराजांची प्रहर सेवा (विना वादन, जप, श्री स्वामीचरित्र वाचन) अखंडपणे सुरू असणार आहे. श्री गणेश याग, मनोबोध याग, गीताई याग, स्वामी याग, चंडी याग, रुद्र याग, मल्हारी यागासह विविध यज्ञ संपन्न होतील.

# नागपुरात प्राध्यापकाच्या घराशेजारी १५ जिलेटीनच्या कांड्या, ५० डिटोनेटर

■ नागपूर



**नागपूर** शहरातील सीए मार्गावरील दोसर भवन चौकाच्या शेजारी राहणारे प्रा. उज्वल अंबादास लांजेवार यांच्या घरा शेजारी बॉम्बसदृश वस्तू आढळून आल्यामुळे खळबळ उडाली आहे. गणेशपेठ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पोलिसांनी सीए मार्गावर बॉम्बनाशक पथकाला पाचारण केले. संशयास्पद पिशवीची तापसणी केली असता जिलेटीनच्या १५ जिलेटीनच्या कांड्या, ५० डिटोनेटर आणि ८ कनेक्टर आढळून आले आहेत.

बॉम्ब बनवण्यासाठी लागणारी हे सामुग्री सापडल्या नंतर पोलिसांनी लगेच हा परिसर सील केला. धक्कादायक बाब म्हणजे गेल्या काही दिवसांपासून ही पिशवी उज्वल लांजेवार यांच्या घराशेजारीच पडलेली होती. उज्वल लांजेवार यांना घराबाहेर पडून आलेल्या त्या पिशवीबाबत संशय आल्यानंतर त्यांनी नागपूर पोलिसांना माहिती दिली. खबरदारी म्हणून पोलिसांनी परिसरातील दुकाने बंद करण्यास सांगितलं आहे. संपूर्ण परिसर निर्मनुष्य करण्यात येत आहे. विशेष म्हणजे या भागापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यालय ४ किमीच्या अंतरावर आहे.

पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंघल म्हणाले की, गेल्या महिनाभरापासून तिथं पिशवी होती. घरमालकानं सांगितल्यानंतर आम्ही पाहणी केली. पुढील कारवाई सुरू आहे.

# शिरपूर व्यापारी सहकारी बँकेचा परवाना रिझर्व्ह बँकेकडून रद्द

■ मुंबई

**भारतीय** रिझर्व्ह बँकेने शिरपूर व्यापारी सहकारी बँकेचा परवाना रद्द केला आहे. ६ एप्रिल रोजी कामकाज संपल्यानंतर बँकेचे व्यवहार पूर्णपणे बंद करण्यात आले. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या निवेदनानुसार, बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक झाली होती.

पुरेसे भांडवल नसणे आणि भविष्यात उत्पन्नाची शक्यता कमी असल्यामुळे बँकेचे कामकाज चालू ठेवणे हे तिच्या ठेवीदारांच्या हितास बाधा आणणारे आहे. तिच्या सध्याच्या आर्थिक स्थितीमुळे, ती आपल्या सध्याच्या ठेवीदारांना पूर्ण रक्कम परत करू शकणार नाही. या निर्णयासोबतच राज्यातील सहकार आयुक्त आणि निबंधकांना बँकेच्या लिक्विडेशन (अवसायन)ची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. लवकरच लिक्विडेटर नियुक्त करून बँकेची मालमत्ता आणि देणी यांचा आढावा घेतला जाणार आहे. दरम्यान, ठेवीदारांच्या पैशांबाबत चिंता निर्माण झाली असली तरी ठेवी विमा आणि पत हमी महामंडळ (डीआयसीजीसी) अंतर्गत प्रत्येक ठेवीदाराला ५ लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण मिळणार आहे.

# अमरावती-अकोला महामार्गावर अपघात ४ तरुणांचा जागीच मृत्यू! ३ जण जखमी

■ अमरावती

**अमरावती-अकोला** महामार्गावर मध्यरात्री अपघातात चार तरुणांचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्घटना बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेलोरा विमानतळाजवळ घडली.

मृतांमध्ये मोहम्मद अनस मोहम्मद सईद (२०), मोहम्मद तल्हा मोहम्मद अनीस (२२), मोहम्मद अवेझ मोहम्मद सईद (२६) आणि अब्दुल अनवेस अब्दुल सलीम (२२) यांचा



समावेश आहे.

हे सर्व तरुण बडनेरा येथील जुनी वस्ती परिसरातील रहिवासी होते. बडनेरातील सात तरुण सोमवारी उशिरा रात्री चहा पिण्यासाठी बेलोरा विमानतळाजवळील एका हॉटेलमध्ये गेले होते. मध्यरात्रीच्या सुमारास चहा घेऊन परतत असताना त्यांच्या कारने रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की, कारमधील चार तरुणांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत उर्वरित तीन तरुण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने अमरावतीतील बडनेरा रोडवरील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू करण्यात आले.

# 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यव्यापी शुभारंभ

■ मुंबई

**जागतिक** आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या 'माझं गाव,आरोग्यसंपन्न गाव' या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह राज्याच्या मंत्रिमंडळातील सर्व विभागाचे मंत्री यावेळी उपस्थित होते. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी या अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. त्यानंतर अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

राज्य शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण



करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे. उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यांसारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देणार आहेत.

# संजय शिरसाटांकडून ओएसडी सिद्धार्थ भंडारे कार्यमुक्त

## मनसेच्या तक्रारीनंतर कारवाई

■ मुंबई

**सामाजिक** न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी त्यांच्या कार्यालयातील ओएसडी (विशेष कार्य अधिकारी) सिद्धार्थ भंडारे यांना कार्यमुक्त केले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अविनाश जाधव यांनी केलेल्या तक्रारीनंतर ही कारवाई करण्यात आल्याचे मानले जात आहे.

अविनाश जाधव यांनी सामाजिक न्याय विभागातील कथित भ्रष्टाचार, अनियमितता आणि प्रशासकीय घोळांबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून सखोल चौकशीची मागणी केली होती. या पत्रात मंत्री संजय शिरसाट यांच्या कार्यालयातील खाजगी सचिव भरत कदम तसेच ओएसडी सिद्धार्थ भंडारे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले होते. भंडारे हे कोणत्याही अधिकृत आदेशाशिवाय ओएसडी म्हणून कार्यरत असल्याचा संशय जाधव यांनी व्यक्त केला होता. तसेच निधी वितरण प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांशी संबंधित कामांमध्ये ऑनलाईन टेंडर प्रक्रियेच्या नावाखाली आगाऊ रक्कम घेऊन कामांचे वाटप केल्याच्या तक्रारीही करण्यात आल्या. याशिवाय, मंत्री कार्यालयाच्या माध्यमातून काही कामे देताना लोकप्रतिनिधी व संबंधितांकडून टक्केवारीची मागणी होत असल्याचाही आरोप पत्रात करण्यात आला आहे.

# जाहिरात परवाना शुल्कवाढ पालिकेला हायकोर्टाचा दिलासा

## दरवाढीच्या अधिकारावर शिक्कामोर्तब

■ मुंबई

**जाहिरात** परवाना शुल्क निश्चित करण्यासंदर्भात मुंबई महापालिका आयुक्तांना असलेले अधिकार संविधान आणि कायद्याला धरुनच आहेत. शुल्कात वाढवण्याचा पालिकेचा अधिकारही वैधच आहे, असा महत्त्वपूर्ण निर्णय उच्च न्यायालयाने दिला आणि दोघा जाहिरातदारांची रिट याचिका फेटाळून लावली. मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम ए. अंखड यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. या निर्णयामुळे महापालिकेला जाहिरात परवाना शुल्कात वाजवी वाढ करून महसूल कमावण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

जाहिरात शुल्कात दरवर्षी १० टक्क्यांची वाढ केली जाते. पालिका प्रशासनाचा हा निर्णय जाचक असल्याचा दावा करीत ऋषभ आऊटडोअर्स आणि सिन्नोवेशन या जाहिरातदारांनी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. तथापि, मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने पालिकेच्या अधिकारावर शिक्कामोर्तब करीत याचिका फेटाळली. जाहिरातदारांनी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ४७९(२) च्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले होते. पालिकेच्या २००९ च्या निर्णयानुसार, जाहिरात शुल्कात सुरुवातीला ८० टक्क्यांनी आणि त्यानंतर दरवर्षी १० टक्क्यांनी वाढ करण्यात आली होती. ही वाढ मनमानी आणि मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारी असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता. खंडपीठाने जाहिरातदारांचा दावा अमान्य केला. वाढता आस्थापना खर्च, घाऊक किंमत निर्देशांकातील वाढ आणि पालिकेच्या सेवांचा वाढलेला खर्च लक्षात घेता जाहिरात परवाना शुल्कात वार्षिक १० टक्क्यांची वाढ करणे अवाजवी ठरत नाही, असा निर्वाळा खंडपीठाने दिला.

# भिवंडी-निजामपूरमध्ये २१ अनधिकृत शाळा

**भिवंडी-** भिवंडी - निजामपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शासनाच्या परवानगीशिवाय सुरु असलेल्या २१ अनधिकृत प्राथमिक शाळांची यादी जाहीर करण्यात येत असून, या शाळांमध्ये पाल्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आपल्या पाल्यांचे प्रवेश घेऊ नयेत, असे आवाहन भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यांत आले आहे.

या शाळेतील विद्यार्थ्यांचे नजिकच्या शासनमान्य शाळांमध्ये समायोजन करण्यात येणार आहे. तसेच संबंधित अनधिकृत शाळांविरुध्द दंडात्मक कार्यवाहीची नोटीस बजावली असून संबंधीतांवर लवकरच फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, अशी माहिती भिवंडी मनपा प्राथमिक शिक्षण विभागा मार्फत देण्यात आलेली आहे.

# महसूल विभागाच्या कागदपत्रांवर अजूनही औरंगाबादचाच उल्लेख

## दानवे यांची सरकारवर टीका

■ छत्रपती संभाजीनगर

**औरंगाबाद** शहराचे नामांतर छत्रपती संभाजीनगर असे होऊन वर्ष पूर्ण झाले असतानाही शासकीय कागदपत्रांमध्ये अजूनही औरंगाबाद नावाचा वापर होत असल्याचा मुद्दा उबाठा गटाचे नेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केला आहे.दानवे यांनी एक्स पोस्ट करत, अशी टीका केली आहे की, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांची ही मोगली मानसिकता आहे

अंबादास दानवे यांनी राज्यातील सहाही महसूल विभागांतील कार्यालयांच्या आकृतिबंधाबाबतच्या एका शासन निर्णयाच्या प्रतीचा फोटो शेअर केला आहे. आहे. यात कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर अशी विभागांची नावे नमूद करण्यात आली आहेत. छत्रपती संभाजीनगरचा उल्लेख जुन्या नावाने झाल्याने त्यांनी आक्षेप घेतला आहे. सरकारवर टीका दानवे म्हणाले की, नामांतराचे ढोल वाजवणाऱ्या भाजपा-शिंदे-पवार सरकारच्या नाकाखाली, महसूल विभागाच्या कागदपत्रांवर अजूनही औरंगाबाद नाचते आहे. हा अधिकाऱ्यांचा मोगली मानसिकतेचा परिणाम असून सरकारचा दुटप्पीपणा दिसून येतो. एकीकडे नावाच्या मुद्द्यावरून निधी रोखण्याची भाषा केली जाते आणि दुसरीकडे सरकारी जीआरमध्ये जुन्याच नावाचा वापर केला जातो. हा केवळ आंधळेपणा नसून मुघलकालीन मानसिकतेचा प्रभाव आहे. मंत्रालय आता शासन निर्णय कमी आणि शाही फर्मान अधिक काढत आहे.

# इगतपुरीत 'श्रमजीवी'चा हंडा-बिऱ्हाड मोर्चा

■ इगतपुरी

**श्रमजीवी** संघटनेच्या वतीने आज पंचायत समितीवर हंडा आणि बिऱ्हाड मोर्चा काढण्यात आला. मोर्चा पंचायत समितीच्या आवारात दाखल झाल्यानंतर आदिवासी बांधवांनी विविध मागण्यांसाठी ठिय्या आंदोलन सुरू केले. घोटेंबा फाटा ते पंचायत समितीपर्यंत निघालेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने महिला लहान मुलांसह सहभागी झाल्या होत्या. पाण्याच्या तीव्र टंचाईच्या पार्श्वभूमीवर महिलांनी डोक्यावर हंडे घेऊन मोर्चा काढत आपला संताप व्यक्त केला.

# मुंबई-विजयदुर्ग रो-रो सेवा २५ दिवसांतच बंद

■ मुंबई

**कोकणकरांचा** प्रवास जलद आणि सोयीस्कर करण्यासाठी सुरू करण्यात आलेली मुंबई-विजयदुर्ग रो-रो सेवा अवघ्या २५ दिवसांतच तात्पुरती बंद करण्यात आली आहे. मुंबईतील भाऊचा धक्का ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्गदरम्यान सुरू झालेली ही सेवा महिना पूर्ण होण्याआधीच स्थगित करावी लागली आहे.समुद्रातील तरंगत्या कचऱ्यामुळे जहाजाच्या इंजिनात तांत्रिक बिघाड झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती संबंधित यंत्रणांकडून देण्यात आली.

१ मार्चपासून एमटूएम फेरीज प्रा. लि.कंपनीकडून एम२एम प्रिन्सेस या जहाजाद्वारे ही सेवा सुरू करण्यात आली होती. या सेवेच्या माध्यमातून

## इंजिन दुरुस्ती सुरू

मुंबई ते विजयदुर्ग हे अंतर अवघ्या सहा ते सात तासांत पार करणे शक्य झाले होते. त्यामुळे प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसादही मिळाला. महिनाभरात या सेवेच्या एकूण सहा फेऱ्या पूर्ण झाल्या.पण सहाव्या फेरीदरम्यान विजयदुर्गहून मुंबईकडे परत येताना समुद्रातील कचऱ्यामुळे जहाजाच्या इंजिनात बिघाड झाला. जहाजातील चार इंजिनांपैकी सध्या केवळ एकच इंजिन कार्यरत असून उर्वरित तीन इंजिनांच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. दुरुस्तीसाठी आवश्यक असलेले सुटे भाग परदेशातून मागविण्यात आले आहेत. मात्र, पश्चिम आशियातील युद्धस्थितीमुळे या भागांच्या पुरवठ्यात विलंब होत असल्याचे सांगण्यात आले. अंदाजे १५ दिवसांत हे भाग उपलब्ध होतील, त्यानंतर दुरुस्तीसाठी आणखी १० दिवस लागण्याची शक्यता आहे, अशी माहिती महाराष्ट्र सागरी मंडळाने दिली.

# एनडीए परीक्षेमुळे १२ एप्रिलची पीसीएम सीईटी परीक्षा रद्द

■ मुंबई

**अभियांत्रिकी** प्रवेशासाठी महत्त्वाची असलेली महाराष्ट्र स्टेट कॉमन एंट्रेंस टेस्ट सेल (पीसीएम) ची १२ एप्रिल रोजी होणारी एमएचटी-सीईटी परीक्षा रद्द केली आहे. महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी ही परीक्षा स्थगित करत सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे.

देशभरात संघ लोकसेवा आयोगामार्फत त्याच दिवशी राष्ट्रीय संरक्षण अकादमी व नौदल अकादमी परीक्षा (एनडीए व एनए), संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (सीडीएस) तसेच राष्ट्रीय वास्तुकला अभिक्षमता चाचणी (नाटा) २०२६ टप्पा १ या महत्त्वाच्या परीक्षा होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. सीईटीने दिलेल्या माहितीनुसार, आता पीसीएमची परीक्षा ११ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ दरम्यान घेण्यात येणार आहे. मात्र, १२ एप्रिल रोजी कोणतीही सीईटी परीक्षा होणार नाही. उर्वरित दिवसांचे वेळापत्रक पूर्वनियोजितप्रमाणेच राहणार आहे.

# मुंबईतील प्रत्येक नगरसेवकाला १ कोटीचा विकास निधी

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेतील प्रत्येक नगरसेवकांला प्रभागातील कामांसाठी १ कोटी रुपयांचा विकास निधी मिळणार आहे.पालिकेचा सन २०२६-२७ चा तब्बल ८०,९५२ कोटींच्या अर्थसंकल्पाला स्थायी समितीने काल मंजूरी दिली.स्थायी समितीला ८०० कोटींचा विकास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

हा अर्थसंकल्प आता अंतिम मंजुरीसाठी ९ एप्रिलला महापालिका सभागृहात सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर १५ एप्रिलपासून सभागृहात अर्थसंकल्पावरील भाषणे होतील व ३० एप्रिलला सभागृहाची मंजूरी मिळेल. नंतरच १ मे पासून अर्थसंकल्प लागू होईल.स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी सांगितले की,मुंबईतील प्रत्येक नगरसेवकाला एक कोटी रुपयांचा विकास निधी दिला जाईल. त्यामुळे मुंबईतील २३७ नगरसेवकांना प्रत्येकी एक कोटी रुपये विकास निधी यावेळीही मिळणार आहे. उर्वरित निधीचे विकास कामांसाठी वाटप केले जाईल.ज्या नगरसेवकांनी विकास निधीसाठी पत्र दिले आहे.त्यांच्या प्रकल्पाचा विचार करून त्यांना निधी उपलब्ध करून दिला जाईल. नगरसेवकांना मिळणार्या निधी व्यतिरिक्त उर्वरित ४६३ कोटी रुपये निधीपैकी महापौरांसाठी १०० ते १५० कोटी रुपयांचा निधी दिला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे या निधीचे वाटप कोणाला करायचे हा सर्वस्वी अधिकार महापौरांचा राहणार आहे.त्यामुळे स्थायी समिती अध्यक्षांकडे ३१३ कोटींचा निधी शिल्लक राहणार आहे. या ३१३ कोटी रुपयांमधून कोणत्या पक्षाला किती निधी मिळणार याबाबत बोलण्यास शिंदे यांनी नकार दिला.

# ठाण्यातील माजिवडा जंक्शन गळती! शनिवारी पाणीपुरवठा बंद

■ ठाणे

**ठाणे** महानगरपालिकेच्या मुख्य जलवाहिनीत मोठ्या प्रमाणात गळती झाल्यामुळे शनिवारी ठाण्यातील काही भागांमध्ये २४ तास पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.माजिवडा जंक्शन परिसरात ही गळती होत असून त्याचा परिणाम वाहतुकीवरही होत आहे.

ही गळती तातडीने दुरुस्त करण्यासाठी ११ एप्रिल रोजी सकाळी ९ ते १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कालावधीत दत्तवाडी, बॉम्बे कॉलनी, जीवन बाग, मुंब्रा देवी, शैलेश नगर, उदय नगर, रेतीबंदर, सम्राट नगर, नारायण नगर, मेक कंपनी जलकुंभ ते शंकर मंदिर परिसर, संजय नगर, रघुकुल, कोपरी कोळीवाडा, पंचगंगा तसेच राबोडी १ व २ आदी भागांमध्ये पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

# तामिळनाडूत हिंदी लादणे कदापि मान्य करणार नाही

■ तंजावर

**तामिळनाडूचे** उपमुख्यमंत्री आणि डीएमकेचे नेते उदयनिधी स्टॅलिन यांनी भाषिक मुद्यावरून केंद्र सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. तामिळनाडू सरकार त्रिभाषा सूत्र कधीही स्वीकारणार नाही.

आमच्या राज्यात हिंदी लादणे कदापि मान्य करणार नाही. आम्ही केवळ तामिळ आणि इंग्रजी या द्विभाषा धोरणावरच ठाम राहू, असा स्पष्ट इशारा त्यांनी केंद्र सरकारला दिला. उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन हे तंजावर जिल्ह्यातील तिरुवैयारू येथे निवडणूक प्रचारादरम्यान बोलत होते. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांच्यावर केलेल्या टीकेला उदयनिधी यांनी चोख प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, केंद्र सरकार राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू करण्याच्या नावाखाली तामिळनाडूवर हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न करत आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण स्वीकारणे म्हणजे



## उदयनिधी स्टॅलिन यांचा केंद्र सरकारला इशारा

हिंदीच्या सक्तीला मुभा देणे होईल,जे तामिळ जनतेला कदापि मान्य नाही. तिरुवैयारू मतदारसंघातील डीएमकेचे उमेदवार दुराई चंद्रशेखरन यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत उदयनिधी यांनी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह भरला. जर तुम्ही २३ एप्रिलच्या निवडणुकीत चंद्रशेखरन यांना ५० हजार पेक्षा जास्त मतांच्या फरकाने विजयी केले, तर मी स्वतः मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून त्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळवून देईन, असे आश्वासन त्यांनी दिले.

# ड्रोनवर चीनचे कडक नियंत्रण नियम मोडल्यास तुरुंगवास

■ बीजिंग

**जगातील** सुमारे ८० टक्के व्यावसायिक ड्रोन तयार करणारा चीन आता आपल्या हवाई क्षेत्रात ड्रोन वापरावर कडक नियंत्रण आणत आहे. २०२५ पर्यंत देशात ३० लाखांहून अधिक ड्रोन नोंदणीकृत झाले असून, एका वर्षात त्यात सुमारे ५० टक्क्यांची वाढ झाली आहे. या वाढत्या संख्येच्या पार्श्वभूमीवर सरकारने नियम अधिक कडक करण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन नियमांनुसार प्रत्येक ड्रोनची रिअल-नेम नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. प्रत्येक ड्रोनला ओळखपत्र किंवा मोबाईल क्रमांकाशी जोडणे बंधनकारक असेल आणि त्याच्या उड्डाणाचा संपूर्ण डेटा रिअल टाईममध्ये सरकारपर्यंत पोहोचवावा लागणार आहे. प्रतिबंधित क्षेत्रांमध्ये ड्रोन उडवण्यासाठी किमान एक दिवस आधी परवानगी घेणे आवश्यक करण्यात आले आहे.

देश विदेश

# देशात इलेक्ट्रिक वाहने वापरा पंतप्रधान शरीफ यांचे आवाहन

■ इस्लामाबाद

**इस्लामाबाद** वाहतूक पोलिसांना इको-स्मार्ट ईव्ही (इलेक्ट्रिक वाहने) देण्याच्या समारंभात पंतप्रधान शहबाज शरीफ उपस्थिती लागली. गगनाला भिडणाऱ्या जागतिक पेट्रोलियम किमतींचा संदर्भ देऊन शरीफ यांनी सांगितले की, देशबांधवानो आता पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक वाहने वापरण्याची गरज आहे, जेणेकरून देशाचा मौल्यवान परकीय चलन वाचणार आहे. या सोहळ्यावेळी अनेक मंत्री, इस्लामाबाद पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी शहबाज शरीफ यांनी नमूद केले की, गृह मंत्रालयाकडून वाहतूक पोलिसांना १५ इलेक्ट्रिक वाहने पुरवण्यात आली. ती पेट्रोल आणि डीझेलचा वापर न करता बॅटरीवर चालतात, तर या वाहनांची दुसरी तुकडी लवकरच दाखल केली जाईल. पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनांच्या तुलनेत प्रत्येक इलेक्ट्रिक वाहनामुळे दरमहा ५.५ लाख रुपयांपर्यंत बचत होईल.

# हवाई दलासाठी १ हजार किलो वजनाचे बॉम्ब खरेदी करणार

■ नवी दिल्ली

**युद्धाच्या** वेळी शस्त्रांची उपलब्धता आणि त्यांची मारक क्षमता किती महत्त्वाची असते, हे लक्षात घेऊन संरक्षण मंत्रालयाने भारतीय वायुसेनेला अधिक मजबूत करण्यासाठी स्वदेशी १००० किलो वजनाचा हवाई बॉम्ब खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. यासाठी संरक्षण मंत्रालयाने ६०० बॉम्बसाठी 'एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट' देखील जारी केला आहे. संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, १००० किलो वजनाचे एकूण ६०० स्वदेशी बॉम्ब तयार करून खरेदी केले जाणार आहेत.

# कोठडीत पिता-पुत्राचा मृत्यू ९ पोलिसांना फाशीची शिक्षा

## तामिळनाडूतील कोर्टाचा निकाल

■ मदुराई

**तामिळनाडूतील** थुथुकडी जिल्ह्यात कोरोना काळात २०२० मध्ये पोलीस कोठडीत पोलिसांनी केलेल्या अत्याचारामुळे पिता-पुत्राचा मृत्यू झाला होता. या खटल्यात मदुराईचे पहिले अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश जी. मुथुकुमारन यांनी ९ पोलिसांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. देशातील पोलिसांना एकाचवेळी अशी शिक्षा मिळण्याची ही पहिलीच घटना आहे. २०२० मध्ये थुथुकुडी जिल्ह्यातील साथानकुलम येथील व्यापारी पी. जयराज आणि त्यांचा मुलगा बेनिक्स यांचा पोलीस कोठडीत छळ केल्याप्रकरणी आणि त्यानंतर झालेल्या मृत्यूसाठी या पोलिसांना दोषी ठरवण्यात आले. या खटल्यातील पहिल्या आरोपीला २४ लाख तर दुसऱ्या आरोपीला १६.३० लाख रुपये अशी नुकसानभरपाई मृत बेनिक्सच्या आईला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले असून आरोपी नुकसानभरपाई देण्यात अपयशी ठरले, तर त्यांची मालमत्ता जप्त करून विकली जाईल. त्यातून मिळणारी रक्कम पीडितांच्या कुटुंबाला दिली जाईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# अल्फा मेल प्रशिक्षणाचा ट्रेंड! अमेरिकेत महागडी शिबिरे

■ वॉशिंग्टन

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**पुरुषांना** अल्फा मेल म्हणजेच अधिक आत्मविश्वासपूर्ण आणि दणकट बनवण्याच्या नावाखाली अमेरिकेत महागडी प्रशिक्षण शिबिरे वेगाने वाढत आहेत. तीन दिवसांच्या अशा कार्यक्रमांसाठी सुमारे २.७८ लाख रुपये शुल्क आकारले जात आहे. या प्रशिक्षणाच्या सुरुवातीला सहभागींच्या डोळ्यांवर पट्टी बांधून त्यांना जुन्या आयुष्यापासून तोडण्याचा' प्रयत्न केला जातो. त्यानंतर चिखलात रांगणे, जड वस्तू उचलणे, उशीशिवाय झोपणे आणि अंधाऱ्या बोगद्यातून चालणे यांसारखी कठोर कामे करून घेतली जातात. याशिवाय भावनिक दडपणाचाही भाग या प्रशिक्षणात असतो. सहभागींच्या बॅगमध्ये ठेवलेल्या रंगीबेरंगी दगडांना राग, अपराधीपणा, लाज आणि दुःखाचे प्रतीक मानले जाते आणि त्यावर सर्वांसमोर बोलण्यास भाग पाडले जाते. या प्रक्रियेत अनेक जण वैयक्तिक आयुष्यातील वेदना व्यक्त करत भावनिक होतात. आयोजक याला 'ब्रदरहुड' म्हणजेच बंधुत्वाची भावना निर्माण करणारी प्रक्रिया म्हणतात. हा ट्रेंड आता प्रौढांपुरता मर्यादित न राहता १२ ते १७ वर्षांच्या किशोरवयीन मुलांपर्यंत पोहोचला आहे. कॅलिफोर्नियामधील काही शिबिरांमध्ये मुलांकडून जड वजन उचलून धावण्याचा सराव करून घेतला जातो आणि त्यांना काही मिनिटे अत्यंत थंड पाण्यात ठेवले जाते. या उद्योगाची एक गंभीर बाजूही उघडकीस आली आहे. २०१९ मध्ये सुरू झालेल्या एका प्रशिक्षण कार्यक्रमात झोपेची कमतरता आणि धोकादायक कृतींमुळे ३० वर्षीय तरुणव्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

# आपत्तीग्रस्तांना कर्जसवलत विमा संरक्षण योजना जाहीर

■ मुंबई

**राज्यातील** आपत्तीग्रस्त नागरिकांना दिलासा देण्यासाठी गृहकर्जात सवलत तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांना कर्जसुविधा आणि विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यास मंजुरी देण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत आपत्ती व्यवस्थापनासाठी खाजगी भांडवलाच्या मदतीने वित्तपुरवठा उभारण्यात येणार आहे. तसेच जागतिक बँकेकडून सुमारे १६५ कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. आपत्तीग्रस्त नागरिकांना गृहकर्जात सवलती देण्याबरोबरच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना कर्जसुविधा आणि विमा संरक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे आपत्तीमुळे प्रभावित झालेल्यांना आर्थिक आधार मिळण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, पुराच्या पाण्याचा निचरा सुधारण्यासाठी कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी या शहरांसह कृष्णा खोऱ्यातील पूरस्थिती कमी करण्यासाठी प्रतिबंधक आराखडे तयार करण्यात येणार आहेत.


महावितरण

**जाहीर सुचना**

२२०/१००/२२ के.व्ही. पाल इचव्ही सबस्टेशन आणि २२/२२ के.व्ही. सोनारपाडा स्विचींग स्टेशन मधून निघणाऱ्या खालील आऊटगोईंग वाहिन्या देखभाल व दुरूस्तीचे कामाकरिता दि. ०९.०४.२०२६ रोजी खाली दिलेल्या वेळेत बंद राहणार असून या काळात कल्याण पूर्व विभागामधील खालील परिसरातील विद्युत पुरवठा पूर्णपणे बंद राहील याची ग्राहकांनी नोंद घ्यावी व म.रा.वि.वि.कंपनीस सहकार्य करावे ही विनंती.

| वाहिनीचे नाव | वेळ | प्रभावित क्षेत्र |
|---|---|---|
| २२ के.व्ही. नांदिवली वाहिनी क्रं. ३०७ | १०.३० ते १४.३० | नांदिवली, भोपर, संदप, घेसर |
| २२ के.व्ही. रिजन्सी वाहिनी क्रं. ३०४ | १०.३० ते १४.३० | शंकर नगर, रिजन्सी आणि दावडी परिसर |

कार्यकारी अभियंता, कल्याण (पूर्व) विभाग



भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

जा.क्र.भिनिशम/सका-४/२०२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०७/०४/२०२६

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**
**सभा सूचना क्र. ०४, दि.१५/०४/२०२६**

प्रति
सन्मा. श्री./ श्रीमती .........................................
सदस्य/ सदस्या, प्रभाग क्र. ()
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.

महोदय/ महोदया,

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र. ४, बुधवार, दि. १५/०४/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता महापालिका मुख्यालयाच्या ३ ऱ्या मजल्यावरील स्व. विलासरावजी देशमुख सभागृहामध्ये बोलविणेत आलेली आहे.

तरी सदर सभेस कृपया आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा. महापौर सो यांचे मंजुरीने व आदेशान्वये

सही/-
(अजय सिताराम पाटील)
प्र. नगरसचिव
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**सभा क्र.४ दि.१५/०४/२०२६ ची विषय पत्रिका**

विषय क्र. — विषय
१. विशेष सभा क्र. २ दिनांक १७/०३/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.
२. महापालिका सदस्यांमधून स्थायी समितीत १६ पालिका सदस्यांची नेमणुक करणे.
३. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२६ करीता नव्याने करण्यात आलेली प्रभाग रचना विचारात घेऊन प्रभाग समिती सिमांकन करणेबाबत.

सही/-
(अजय सिताराम पाटील)
प्र. नगरसचिव
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

सहपत्र:-
१. विषय क्र. १ इतिवृत्त प्रत व विषय क्र. २ व ३ प्रस्ताव
जा.क्र./ज.सं.वि./४०८


# कुरव्यात भूमाफिया 'रंधा' अटकेत जमीन बळकावून चाळी उभारल्या

■ वसई

**वसईतील** कुख्यात भूमाफिया सुरेंद्र प्रताप सिंह ऊर्फ 'रंधा' याला २१० गुंठे जमीन बळकावून त्यावर अनधिकृत चाळी उभारल्याप्रकरणी गुन्हे शाखा ४ ने अटक केली आहे. तक्रारदार यांची वसई पूर्वेच्या मौजे राजावली परिसरातील सर्व्हे क्रमांक १४६ (हिस्सा ३) व १४९ (हिस्सा २) येथे २१० गुंठे जमीन आहे. आरोपीने २०२० ते २०२५ दरम्यान बेकायदेशीररीत्या ही जमीन ताब्यात घेतली. मूळ मालकाला कोणतीही रक्कम न देता बिल्डरांशी संगनमत करून त्यावर चाळी उभारल्या. या चाळीतील खोल्यांची विक्री करत सर्वसामान्यांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. तक्रारदाराने पैसे मागितल्यावर आरोपी व त्याचा साथीदार अरविंद अलगू सिंह ऊर्फ 'दारा' यांनी जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE No. 065/2025-2026**

The Superintending Engineer (Civil) EHV CCCM Circle, Airoli on behalf of MSETCL (the employer) hereby invites SRM E-tender mentioned below from registered contractors of appropriate class with central or State Govt. / Semi Govt. Department and also registered under M.S.E.T.C.L.'s SRM E-Tender registration system on Mahatransco SRM E-Tendering Website.

| Sr.No. | RFx No. | Name of work |
|---|---|---|
| 1 | 7000039518 | Providing services of 3 nos of Outsource manpower, 1 no of skilled outsource manpower i.e. driver at EHV CCCM Circle, Airoli for the F.Y. 2026-2027. |

For further details visit our Website **https://srmetender.www.mahatransco.in (Guest User).**
**Contact Person:** Dy. Executive Engineer (Civil) : Phone No. (022) 27601622 / Mob. No. +91 9769978832.

Sd/-
**Superintending Engineer (Civil)**
**EHV CCCM Circle, Airoli**


# कर्मचाऱ्यांना शिल्लक सुट्ट्यांचा आता रोख मोबदला मिळणार

**नवी दिल्ली** - केंद्र सरकारने कामगार कायद्यातील कर्मचाऱ्यांच्या वार्षिक सुट्ट्यांच्या रोखीकरण सुविधा (लिव्ह एन्कॅशमेंट) नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत.त्यामुळे आता कर्मचाऱ्यांना त्यांच्या शिल्लक सुट्ट्यांच्या बदल्यात कंपनीकडून रोख मोबदला दिला जाणार आहे. नव्या नियमांनुसार, कर्मचारी दरवर्षी त्यांच्या शिल्लक सुट्ट्यांचा रोख मोबदला घेऊ शकतील.यापूर्वी साधारणपणे निवृत्तीच्या वेळी किंवा नोकरी सोडताना कर्मचाऱ्यांना शिल्लक सुट्ट्यांचा रोख मोबदला मिळत असे. मात्र आता वर्षअखेरीस ही सुविधा उपलब्ध होणार आहे. कर्मचाऱ्यांसाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे.


मुख्य कार्यालय, विरार
यशवंत नगर, विरार (प.)
ता. वसई, जि. पालघर, पिन - ४०१३०३

दूरध्वनी : 0250-2525101/02/03/04/05/06
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : **vasaivirarcorporation@yahoo.com**
जा.क्र.: व.वि.श.म./पापु/३३/२०२६
दि. : ०७/०४/२०२६

**पाणी पुरवठा विभाग, मुख्यालय, विरार पूर्व**
**चतुर्थ वेळ जाहिर ई-निविदा सूचना**

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३० द.ल.ली. बोळींज मलनिःसारण केंद्रामधील Air Blower, STDU ची Retro fitting सह Refurbished ( नुतनीकरण) करणे तसेच Wet Well व Fine Screen करीता नव्याने पॅनल पुरविणे बसविणे व कार्यान्वीत करणे कामाची कोरे निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि. ०८/०४/२०२६ पासुन उपलब्ध होणार आहे. ई टेंडरिगं बाबत अधिक माहितीसाठी ई - निविदा कक्ष, वसई-विरार शहर महानगरपालिका, विरार, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

**Please Visit our official web-site**
**(https://mahatenders.gov.in)**

सही/-
(सुरेंद्र ठाकरे)
प्र. कार्यकारी अभियंता
वसई-विरार शहर महानगरपालिका

जावक क्र. : व.वि.श.म./मा.व.ज./९७/२०२६



मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)
Ref No. EE/E-2 / MBRRB / e-Tender / DDR/03/2026-27.
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३ यांनी खाली दर्शविलेल्या कामाकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे **नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था** कडून बी-१ (टक्केवारी नमुन्यात) ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचे अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कामगार सहकारी संस्थेचा नोंदणी वर्ग | निविदा रक्कम (GST सहीत) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विशेष दुरुस्ती अंतर्गत संक्रमण शिबिरातील इमारत क्र. १A, १B, १C, २A, २B, ३A, ३B, ३C, ३D, ३E, गव्हाणपाडा, मुंबई. ई- २ वार्ड येथील इमातींमध्ये झाडलोटचे काम करणे. कालावधी ०१.०४.२०२६ ते ३१.०३.२०२७ | २०,५७,२४८/- | निरंक | २१,०००/- (५०% सुरुवातीस ५०% बिलातुन कपात) | वर्ग-ब व त्यावरील | ५९०/- | १२ महिने (पावसाळ्याचा कालावधी धरुन) |

| अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|
| १ | जाहिरात दिनांक | १०/०४/२०२६ सकाळी १०:०० वाजता |
| २ | निविदा विक्री सुरू | १०/०४/२०२६ सकाळी १०:१० वाजता |
| ३ | निविदा विक्री बंद | १७/०४/२०२६ सायंकाळी १७:४० वाजेपर्यंत |
| ४ | निविदा स्विकृती सुरू | १०/०४/२०२६ सकाळी १०:१० वाजता |
| ५ | निविदा स्विकृती अंतिम दिनांक | १७/०४/२०२६ सायंकाळी १७:४० वाजेपर्यंत |
| ६ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | २०/०४/२०२६ सकाळी ११:०० वाजता |
| ७ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | २०/०४/२०२६ सकाळी ११:०० वाजता |

१) संपूर्ण निविदा पध्दती ही ऑनलाईन स्वरूपाची राहील. त्याबाबतच्या सर्व सुचना, अटी व शर्थी http://mahatenders.gov.in म्हाडाच्या MHADA Website-http://mhada.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिध्द केल्या जातील.
२) निविदा विषयीची कागदपत्रे दि. **१०/०४/२०२६** रोजी सकाळी १०.१० नंतर ते **१७/०४/२०२६** सायंकाळी १७:४० वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करू शकता येतील.
३) निविदा अर्जाची रक्कम तसेच इसारा रक्कम ऑनलाईन भरणे आवश्यक राहील.
४) तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक **२०/०४/२०२६** सकाळी ११:०० वाजता व आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक **२०/०४/२०२६** सकाळी ११:०० वाजता कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३, यांचे दालनात उघडल्या जातील.
५) निविदाकारांनी ई निविदेद्वारे अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती तांत्रिक बोली उघण्याच्या वेळेस खातरजमा करण्याकरीता सादर करणे आवश्यक राहील.
६) निविदाकारांनी तांत्रिक बोलीमध्ये नमूद कागदपत्रे पीडीएफ फॉर्मेटमध्ये तांत्रिक बोलील्या लिफाफ्यात सादर करावीत.
७) निविदाकारांकडे वर्ग II / III मान्यताप्राप्त प्राधिकारणाकडून मिळविलेली डीजीटल सिग्नेचर प्रमाणपत्रे असणे आवश्यक राहील.
८) कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, यांचेकडे (निविदा स्विकृती अधिकाऱ्यांकडे) निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राहील.
९) इच्छुक बोलीदारांना शासनाच्या ठराव क्र. सीएटी ०१/२०१५/प्र.क्र . २०/ इमा-२, दि. २४/०४/२०१५ चे पालन करणे आवश्यक राहील.
१०) निविदाकारांनी जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक आहे
११) जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अमानत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करुन त्यांनी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्यांची निविदा मंजूर केली जाईल अतिरिक्त सुरक्षा अमानत बाबत सविस्तर सुचना पहावी.
१२) जीएसटी शिवाय SSR दर वर्ष २०२० - २१ वर आधारित निविदा मागवली आहे. स्विकृत करार मुल्यावर जीएसटी भरला जाईल.
१३) ई निविदा कागदपत्रे व ई निविदा विषयक मार्गदर्शक सुचना http://mahatenders.gov.in या संकेत डाऊनलोड करता येतील. मदतीसाठीः १८००-३०७०-२२३२ Mail-eproc.support@maharashtra.gov.in

सही/-
कार्यकारी अभियंता ई-२ विभाग,
मुं. इ. दु. व पू. मंडळ, मुंबई

CPRO/A/267
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial


# महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग सेंटरचे कंपनीत रूपांतर

■ मुंबई

**मंत्रिमंडळ** बैठकीत नियोजन विभागाने आज दोन महत्वाचे निर्णय घेतले आहेत. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरचे रूपांतर आता कंपनीत करण्यात येणार आहे. सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत असलेली नोंदणी रद्द करून कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम ८ अंतर्गत नव्या कंपनीची स्थापना करण्यात येणार आहे. या निर्णयानुसार महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर (महाजिओटेक) या नावाने कंपनी स्थापन होणार आहे. भू-स्थानिक तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावी वापर करून प्रशासन अधिक गतिमान करण्याचा यामागील उद्देश आहे. या बदलामुळे रस्ते माहिती प्रणाली, नगररचना, जलयुक्त शिवार व पाणलोट विकास, डोंगरी विकास योजना, ई-पंचनामा, महा ॲग्री टेक, कांदळवन अभ्यास, भूजल व्यवस्थापन तसेच खनिज व खाणींच्या अभ्यासाला गती मिळणार आहे. याबरोबरच भू-स्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासनात गतिमानता आणण्याकरिता महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी ॲप्लिकेशन सेंटर (महाजिओटेक) कंपनी स्थापन होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, भू-स्थानिक नवोप्रक्रम आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी या कंपनीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**NOTICE INVITING TENDER CPD/02-2026-27**

Tenders are invited through e-Tendering in SRM Two Bid system from the registered vendors for Supply of following:

| Tender No. & Description of Material | Estimated Amount (in Rs. Lakhs) / Tender Fee (in Rs.) Excluding GST | Due Date & Time (Hrs.) Submission & Opening of Tender |
|---|---|---|
| **SP/T-0503/0426 RFX No 5000001527 [3rd Call]** for Procurement of 12kV, 1600A, 12.5kA, WOEB (07 Set) and 12kV, 800A, 12.5kA, WOEB (07 Set) and 12kV, 400A, 12.5kA, WEB (07 Set) Isolators with Support Structure (Total 21 Set) as Spares through R&M Budget meant for all the Zones of MSETCL. | Rs. 9.50 / 500.00 | 17.04.2026 18:00 Hrs / 17.04.2026 18.05 Hrs |
| **Pre Bid Meeting Date & Venue** | **Date:** 10.04.2026 **Time:** 14:30 Hrs. | **Venue:** 8th Floor, MSETCL, Prakashganga, BKC, Bandra (E), Mumbai |

**Contact Person:** Office of the Executive Engineer (Gr-V)
CPA, C.O. MSETCL, 1st Floor, Prakashgad Building, Bandra (E), Mumbai
**Tel. No.:** 022-69852717/69852720
**Email id:** cecpa@mahatransco.in, secpa@mahatransco.in, eegrp5@mahatransco.in
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
Any further amendments/clarifications will be published on the MSETCL website **www.mahatransco.in** & **https://srmetender.mahatransco.in/**. Bidders are therefore requested to check these websites for further updates.

Sd/-
**Executive Engineer (P&C)**

# कृती बनणार कल्याणराम यांची नायिका



टॉलीवूडमधील यशस्वी दिग्दर्शक अनिल राविपुडी यांच्या आगामी मोठ्या प्रकल्पात आता अभिनेत्री कृती शेट्टीचा अधिकृत प्रवेश झाला आहे. वेन्कटेश आणि नंदामुरी कल्याणराम यांची मुख्य भूमिका असलेल्या या बहुचर्चित चित्रपटात कृती शेट्टी ही कल्याणराम यांच्या नायिकेच्या रूपात दिसणार आहे. अनिल राविपुडी हे त्यांच्या सणासुदीला प्रदर्शित होणाऱ्या ब्लॉकबस्टर चित्रपटांसाठी ओळखले जातात. आताचा चित्रपट एक कौटुंबिक मनोरंजक असणार असून, तो पुढील वर्षीच्या संक्रांतीच्या मुहूर्तावर प्रदर्शित करण्याचे नियोजन आहे.

'उप्पेना' या पहिल्याच चित्रपटातून प्रसिद्धीझोतात आलेल्या कृती शेट्टीने अलीकडेच आपल्या शरीरयष्टीवर आणि लूकवर विशेष मेहनत घेतली आहे. तिचे हे 'ट्रान्सफॉर्मेशन' चाहत्यांच्या पसंतीस उतरले असून, यामुळे तिला तेलगू सोबतच तमिळ आणि मल्याळम चित्रपटांच्या ऑफर्सही मिळत आहेत. तिचा 'लव्ह इन्शुरन्स कंपनी' हा तमिळ चित्रपट येत्या १० एप्रिल रोजी तमिळ आणि तेलगू अशा दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित होत आहे. या चित्रपटात प्रदीप रंगनाथन मुख्य भूमिकेत आहे.

# 'आखरी सवाल'चे प्रदर्शन लांबले

नॅशनल अवॉर्ड विजेते दिग्दर्शक अभिजित मोहन वारंग यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला आणि संजय दत्तची मुख्य भूमिका असलेला 'आखरी सवाल' हा चित्रपट आता नियोजित वेळेच्या आधीच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सुरुवातीला हा चित्रपट १६ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणार होता. परंतु आता तो सुधारित तारखेनुसार ८ मे २०२६ रोजी प्रदर्शित करण्याचा निर्णय निर्मात्यांनी घेतला आहे. १९२५ मध्ये स्थापना झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) इतिहासावर हा चित्रपट आधारित असून, त्यात अनेक अज्ञात पैलू उलगडणार आहेत. या टीझरने सोशल मीडियावर आधीच मोठी चर्चा घडवून आणली असून, त्यातील प्रक्षोभक व थेट मांडणीमुळे प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. निखिल नंदा मोशन पिक्चर्सच्या बॅनरखाली तयार झालेला हा चित्रपट मे महिन्यातील एक महत्त्वाचा चित्रपट ठरणार आहे.




# स्वानंद किरकिरेंनी गायले अंगाई गीत




राष्ट्रीय पुरस्कार विजेते गायक, गीतकार आणि अभिनेते स्वानंद किरकिरे यांनी आगामी 'सुपर डूपर' या मराठी चित्रपटासाठी 'अंगाई' हे अंगाईगीत गायले असून, या गाण्यातील निरागसता आणि प्रामाणिकपणा मनाला स्पर्शून जाणारा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. समीर आशा पाटील यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेल्या या चित्रपटात ललित प्रभाकर आणि विदुला चौगुले मुख्य भूमिकेत आहेत. कुणाल करण यांनी लिहिलेले हे गीत चित्रपटाच्या भावनिक प्रवासातील एक महत्त्वाचा दुवा ठरेल, असा विश्वास किरकिरे यांनी व्यक्त केला आहे. चित्रपटाबद्दल बोलताना स्वानंद म्हणाले की, हा चित्रपट प्रेक्षकांच्या हृदयाला भिडणारा असून त्याची कथा मांडण्याची पद्धत अतिशय प्रभावी आहे. 'अंगाई' या गाण्यातील कथानकात जी संवेदनशीलता आहे, ती त्यांना या प्रकल्पाकडे आकर्षित करण्यास पुरेशी ठरली. एक कलाकार म्हणून नेहमीच मनाला स्पर्श करणाऱ्या कामाच्या शोधात असल्याचे सांगत, या गाण्याचे ध्वनिमुद्रण करणे हा एक अत्यंत समाधानकारक अनुभव होता, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

# 'मर्सिडीज' खरेदीच्या ट्रेंडमध्ये कार्तिक आणि बोनीही!

बॉलीवूड इंडस्ट्रीतील कलाकारांच्या आलिशान जीवनशैलीमध्ये आरामदायी आणि आधुनिक चार चाकींना खास स्थान आहे. जसजसे स्टारडम आणि उत्पन्न वाढत जाते तसतसा कलाकारांचा चार चाकींचा ताफा रुंदावत जातो. यामध्ये मर्सिडीजचे साम्राज्य ठळकपणाने दिसते. अलीकडेच शाहरुख आणि अजय देवगणने नव्या मर्सिडीजची खरेदी केल्याचे समोर आले. आता बॉलीवूडचा तरुण सुपरस्टार कार्तिक आर्यननेही आपल्या कार संग्रहात आता मर्सिडीज-बेंझ व्ही-क्लास या आलिशान 'एम पीव्ही'चा ( समावेश केला आहे.

या गाडीची किंमत सुमारे १.४ कोटी ते १.७ कोटी रुपयांच्या दरम्यान आहे. ही गाडी प्रामुख्याने तिच्या प्रशस्त केबिन आणि एक्झिक्युटिव्ह स्टाईल आसनव्यवस्थेसाठी ओळखली जाते. ६ आसनी व्यवस्था, 'अँबियंट लाइटिंग' आणि प्रगत 'सस्पेंशन'मुळे ही गाडी लांबच्या प्रवासासाठी अत्यंत सुखद ठरते. विशेष म्हणजे, अलीकडेच निर्माता बोनी कपूर यांनीही याच मॉडेलची खरेदी केली आहे. कार्तिक आर्यनकडे आधीच महागड्या आणि वेगवान गाड्यांचा मोठा संग्रह आहे. 'भूल भुलैया २'च्या यशानंतर भूषण कुमार यांनी भारताची पहिली मॅकलेरन जीटी कार्तिकला भेट दिली होती.






# जॅकी श्रॉफ आणि सुनील शेट्टी पुन्हा एकत्र?



जॅकी श्रॉफ आणि सुनील शेट्टी या बॉलीवूडमधील दोन दिग्गज अभिनेत्यांच्या एका रहस्यमय 'रील'मुळे सोशल मीडियावर सध्या मोठी खळबळ उडाली आहे. या दोन्ही अभिनेत्यांनी त्यांच्या अधिकृत इंस्टाग्राम हँडलवर एक छोटेखानी व्हिडिओ शेअर केला असून, त्यावरून ते एखाद्या मोठ्या प्रकल्पासाठी एकत्र येत असल्याचे संकेत मिळत आहेत. ही रील एखाद्या व्हॉट्सॲप चॅटच्या स्वरूपात तयार करण्यात आली आहे. यामध्ये जॅकी आणि सुनील यांच्यातील एक संक्षिप्त पण अत्यंत रंजक संवाद पाहायला मिळतो. या संवादाचा कोणताही स्पष्ट संदर्भ देण्यात आलेला नसल्यामुळे, चाहते आता तर्कवितर्क लढवत आहेत. हे दोघे एखाद्या नवीन चित्रपटासाठी एकत्र येत आहेत की एखाद्या ओटीटी प्रकल्पासाठी, याबाबत अद्याप गुप्तता पाळण्यात आली आहे. ही जोडी नेमकी काय नवीन घेऊन येणार आहे, हे पाहण्यासाठी आता संपूर्ण सिनेसृष्टी सज्ज झाली आहे.

# मनीषा झळकणार 'राजदार'मध्ये





संजय लीला भन्साळी यांच्या 'हीरामंडी' या भव्य वेब मालिकेतील 'मल्लिकाजान'च्या भूमिकेतून प्रेक्षकांची मने जिंकल्यानंतर आता अभिनेत्री मनीषा कोईराला एका नव्या भूमिकेत दिसणार आहे. सुमारे दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मनीषाने अरबाज खानच्या 'राजदार' या चित्रपटासाठी स्वाक्षरी केली आहे. 'हीरामंडी'च्या यशानंतर मनीषाकडे अनेक चित्रपटांच्या ऑफर्स होत्या. मात्र, कसदार आणि लेखकप्रधान भूमिकांचीच निवड करण्यावर तिचा भर होता. यादरम्यान 'राजदार'ची कथा आणि त्यातील तिची भूमिका मनीषाला भावली आणि तिने या चित्रपटात काम करण्यास संमती दर्शवली. या चित्रपटाचे चित्रीकरण या वर्षाच्या सुरुवातीलाच सुरू झाले आहे. मध्य प्रदेशातील भोपाळमध्ये २५ दिवसांचे तर मुंबईत १० दिवसांचे चित्रीकरण पूर्ण झाले आहे. या चित्रपटात अरबाज खान स्वत: आणि 'फर्जी' फेम अभिनेता भुवन अरोरा यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

# भरती चाचणीत हृदयविकाराचा झटका

## २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू

■ गडचिरोली

**गडचिरोलीत** राज्य राखीव पोलीस दल (एसआरपीएफ) भरतीच्या शारीरिक चाचणीदरम्यान धावत असताना हृदयविकाराच्या झटक्याने २१ वर्षीय आशिष भास्कर म्हशाखेत्री या तरुणाचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

भारत राखीव बटालियन-४ अंतर्गत राज्य राखीव पोलीस बल गट क्र. २७, चंद्रपूर येथील आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई संवर्गातील २४४ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. या भरतीअंतर्गत राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १३, विसोरा येथील कवायत मैदानावर ३१ मार्चपासून शारीरिक चाचण्यांना सुरुवात झाली आहे. उन्हाचा त्रास टाळण्यासाठी चाचण्या पहाटे ४ ते सकाळी ९ या वेळेत घेतल्या जात आहेत. देलोडा येथील आशिष म्हशाखेत्री हा युवक चाचणीसाठी पहाटेच विसोरा येथील मैदानावर उपस्थित झाला होता. सीआरपीएफचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत तो धावण्याच्या चाचणीत सहभागी झाला. पण धावत असताना शेवटच्या टप्प्यात धावपट्टीच्या सीमारेषेजवळ तो अचानक कोसळला.त्यानंतर तात्काळ त्याला देसाईगंज येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असतानाच १० ते १५ मिनिटांत त्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.

# चंद्रपुरात मधमाश्यांचा हल्ला एकाचा मृत्यू, दोघे जखमी

■ चंद्रपूर

**चंद्रपूर** शहराजवळील दुर्गापूर ग्रामपंचायत हद्दीत मधमाश्यांच्या हल्ल्यात एक सेवानिवृत्त कर्मचारी मधुकर रंगारी (६५) यांचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले आहेत.

दुर्गापूर ग्रामपंचायत हद्दीतील एका मैदानावर क्रिकेट सामने सुरू होते. या सामन्यादरम्यान लावण्यात आलेल्या डीजेच्या मोठ्या आवाजामुळे जवळील झाडावरील मधमाश्यांचे पोळे अस्वस्थ झाले. त्यानंतर मधमाश्यांचे मोहोळ उठून त्यांनी मैदानावरील नागरिकांवर अचानक हल्ला चढवला.

या हल्ल्यात मधुकर रंगारी यांना गंभीर दुखापत झाली. त्यांना तत्काळ उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तसेच या घटनेत आणखी दोन जण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# पंढरपुरात अनिल सावंतांचा शरद पवार गटाला रामराम




■ पंढरपूर

**पंढरपूरच्या** मंगळवेढ्यातील भैरवनाथ शुगरचे अध्यक्ष आणि शरद पवार गटाचे नेते अनिल सावंत यांनी पक्षाचा राजीनामा दिल्याने पवार गटाला मोठा धक्का बसला आहे.

अनिल सावंत हे लवकरच शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची माहिती आहे. सावंत यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पंढरपूर मतदारसंघातून शरद पवार गटाकडून निवडणूक लढवली होती. मात्र, या निवडणुकीत भाजपाचे समाधान आवताडे यांनी मोठ्या मताधिक्क्याने विजय मिळवला होता. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील मतविभागणीचा फटका सावंत यांना बसल्याचे बोलले जाते.

दरम्यान, काँग्रेसचे नेते भगीरथ भालके हेही शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. भालके यांच्या प्रचारासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी मोठ्या प्रमाणात मेहनत घेतली होती. मात्र, आता त्यांच्या संभाव्य पक्षांतरामुळे पंढरपूर-मंगळवेढा भागात महाविकास आघाडीला दुहेरी धक्का बसण्याची शक्यता आहे.

# खत कारखान्यांचा गॅस पुरवठा आता ९० टक्क्यांपर्यंत वाढवला



■ नवी दिल्ली

**पश्चिम** आशियातील तणावामुळे निर्माण झालेल्या इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर, भारत सरकारने कालपासून देशातील खत कारखान्यांना नैसर्गिक गॅसचा पुरवठा त्यांच्या सहा महिन्यांच्या सरासरी गरजेच्या ९० टक्क्यांपर्यंत वाढवला आहे, अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी दिली.

सुजाता शर्मा म्हणाल्या की, पश्चिम आशियातील युद्धामुळे आखाती राष्ट्रांकडून होणाऱ्या इंधन पुरवठ्यात व्यत्यय आला होता. त्यामुळे देशातील खत कारखान्यांना केला जाणारा नैसर्गिक वायूचा पुरवठा ६० टक्क्यांपर्यंत कमी झाला होता, तो नंतर ७५-८० टक्के करण्यात आला. आता तो ९० टक्के करण्यात आला आहे.

वास्तविक कतारकडून होणारा एलएनजी पुरवठा स्थगित असताना भारतीय कंपन्या अमेरिका, ऑस्ट्रेलिया व रशियामधील पर्यायी पुरवठादारांकडून खरेदी करत आहेत. या अतिरिक्त पुरवठ्यामुळे विविध क्षेत्रांच्या कोट्यात वाढ झाली आहे. तसेच, सिटी गॅस वितरण नेटवर्कसह इतर औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्रांना होणारा गॅस पुरवठाही कालपासून अतिरिक्त १० टक्क्यांनी वाढवला आहे.

# ७३ गावांतून जाणार 'शक्तिपीठ' सुधारित आराखड्यास मंजुरी

■ जयसिंगपूर

**राज्य** शासनाने नुकतीच शक्तिपीठ महामार्गाच्या सुधारित आराखड्याला मंजुरी दिली आहे.यात १३ जिल्ह्यांतील ४० तालुक्यांचा समावेश आहे.आता नवीन शक्तिपीठ आराखड्यात कोल्हापूर जिल्ह्यातील ७३ गावे,सांगलीतील २५ गावे,सातारा जिल्ह्यातील १६ गावे, सोलापूर जिल्ह्यातील ३५ गावांचा समावेश होणार आहे.

याशिवाय शक्तिपीठ मार्गावर अनेक नद्यांवर पूल व डोंगर परिसरात घाट होणार आहेत.

शक्तिपीठ महामार्ग कोल्हापूर जिल्ह्यात वारणा नदी पार करून जुने पारगाव येथे प्रवेश करणार आहे. त्याचबरोबर करवीर, राधानगरी, भुदरगड, आजरा व चंदगड तालुक्यांतून इसापूर भागातून तो सिंधुदुर्ग जिल्ह्यात जाणार आहे. तर, सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातून सुरुवात होणारा मार्ग पलूस, कडेगाव,वाळवा तालुक्यांतून कोल्हापूर जिल्ह्यात येणार आहे. त्याचबरोबर सातारा जिल्ह्यातील म्हसवड भागातून हा मार्ग जात मायणीच्या पुढील बाजूस सांगलीतील खानापूर तालुक्यात प्रवेश करणार आहे. तसेच धाराशिव जिल्ह्यातून सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करीत बार्शी,माढा,माळशिरस या तालुक्यांतून तो सातारा जिल्ह्यात जाणार आहे. शासनाने या मार्गाला नव्याने मंजुरी दिली आहे.



# मिरा-भाईंदरमध्ये ३० टक्के जागा नरेंद्र मेहतांच्या आहेत

**सरनाईकांची मुख्यमंत्र्यांसमोर गुगली**

■ भाईंदर

**परिवहन** मंत्री प्रताप सरनाईक यांनी आपले राजकीय प्रतिस्पर्धी असलेल्या नरेंद्र मेहता यांच्याबाबत मुख्यमंत्र्यांसमोर केलेली टिप्पणी चांगलीच रंगली आहे. मेट्रो प्रवासात गप्पा मारताना मिरा भाईंदर शहरातील ३० टक्के जागा नरेंद्र मेहता यांच्या असल्याचे सरनाईक यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले. मेहता यांनी लगेच असे असल्यास त्यातील १० टक्के जागा देण्यास तयार आहे, असे सांगितले. या संवादाची चित्रफित चांगलीच रंगली आहे.

भाईंदरचे आमदार आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यातील वाद मागील महापालिका निवडणुकीपासून विकोपाला गेला आहे. एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी दोन्ही नेते सोडत नाही. मेट्रोच्या कामाचे श्रेय घेण्यावरून दोन्ही नेत्यांमध्ये चढाओढ लागली आहे. आता या मेट्रोच्या कार्यक्रमात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलेले वक्तव्य माध्यमांच्या कॅमेऱ्याने टिपल्याने चर्चा सुरू झाली. दहिसर- मिरा रोड मेट्रो मार्गिकेच्या लोकार्पण सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दोन्ही उपपमुख्यमंत्री उपस्थित होते. त्यांनी मेट्रोने हिसरहून स्थानकातून काशिगावपर्यंत प्रवास केला.

# सिंधुदुर्गातील ५२ मंदिरांचा कायापालट लवकरच होणार

■ सिंधुदुर्गनगरी

**जिल्हा** वार्षिक योजनेतील क वर्ग यात्रा स्थळ विकास योजनेंतर्गत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ४ कोटी २१ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. जिल्ह्यातील ५२ मंदिरांचा पर्यटन दृष्ट्या कायापालट होणार आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मंदिरांचा विकास आणि कायापालट करण्यासाठी दरवर्षी जिल्हा नियोजन मंडळाकडून निधी उपलब्ध करून दिला जातो. या निधीतून मंदिर परिसराचे सुशोभीकरण, संरक्षण भिंत उभारणे, पेव्हर ब्लॉक बसवणे भक्तनिवास बांधणे, पिण्याच्या पाण्याची योजना यासारखी कामे केली जातात. त्यानुसार २०२५ मध्ये ४ कोटी २१ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. २०२६ मध्ये जिल्ह्यातील ५२ मंदिरांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी या कामांसाठी हा निधी मंजूर केला असून या योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषदेच्या वतीने ग्रामपंचायत विभागाकडून करण्यात येत आहेत.

# माटुंगा रेल्वे कारशेडमध्ये रेल्वे डब्याला भीषण आग

**मुंबई** - माटुंगा रेल्वे कारशेडमध्ये उभ्या असलेल्या एका मेल-एक्स्प्रेसच्या डब्याला भीषण आग लागली. दुरुस्तीसाठी कारशेडमध्ये ठेवण्यात आलेल्या या डब्याला अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले. डब्यात दुरुस्तीचे काम सुरू असताना वेल्डिंग करताना ठिणगी पडून आग लागल्याची माहिती आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नाही. मात्र, या आगीबाबत संशयही व्यक्त करण्यात येत असून मनसे कामगार सेनेचे चिटणीस अनीष खंडागळे यांनी आग लागली की लावली गेली, असा सवाल उपस्थित केला आहे.



# भाईंदरमधील 'तो' पूल योग्यच! मुख्यमंत्र्यांचा दावा

■ भाईंदर

**भाईंदर** शहरात मेट्रो मार्गावर उभारण्यात आलेल्यास आधी दोन आणि नंतर एक मार्गिकेच्या पुलाची रचना योग्य असून, अर्धवट अवस्थेतील छायाचित्रे प्रसारित झाल्यामुळे गैरसमज निर्माण झाला. पुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर सर्व शंका दूर होतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

भाईंदरमध्ये मेट्रो मार्गालगत उभारण्यात आलेला उड्डाणपूल पूल दोन मार्गिकेवरून अचानकपणे एक मार्गिकेचा होत असल्याने वादात सापडला आहे. या पूलाची रचना दोषपूर्ण असल्याने अपघातांचा धोका असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. आज मेट्रो मार्गिकेच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री शहरात आले असताना, त्यांना या पुलाबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना त्यांनी सांगितले की, पुलाच्या अर्धवट रचनेची छायाचित्रे प्रसारित झाल्यामुळेच हा संभ्रम निर्माण झाला.


अत्यंत कमी जागेत हा पूल उभारण्यात आला असून, त्याची रचना भविष्यातील गरज लक्षात घेऊन करण्यात आली आहे.

# एलपीजी गैरव्यवहार प्रकरणी बीपीसीएलची कडक कारवाई

■ मुंबई

**'महारत्न'** सार्वजनिक उपक्रम असलेल्या भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणजेच बीपीसीएने एलपीजी वितरण साखळीतील अनियमिततेविरोधात कडक कारवाई सुरु केली आहे. एलपीजी वितरणातील कथित गैरव्यवहारांप्रकरणी कंपनीने चार वितरकांना निलंबित केले असून इतर अनेकांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सुरू केली आहे. नियमभंगाच्या प्रकरणांमध्ये शून्य सहनशीलता धोरणाचा पुनरुच्चार करत बीपीसीएलने आतापर्यंत १६२ एलपीजी वितरकांवर शिस्तभंगाची कारवाई केली आहे. आणखी ३१६ वितरकांविरुद्धची चौकशी सध्या सुरू आहे. सार्वजनिक तेल विक्री व विपणन कंपनीने एलपीजी पुरवठा साखळीमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि ग्राहक संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी बीपीसीएल कटिबद्ध असल्याचे म्हटले आहे.

## नवाकाळ शब्दकोडे-१५६९



**आडवे शब्द –**

३. कौतुकाचा उद्‌गार ५. शर्त ६. निर्दयीपणे दिलेला त्रास, जुलूम ९. फाल्गुन कृष्ण द्वितिया, संत तुकाराम यांची पुण्यतिथी १२. प्रखर १३. पाऊस १५. वाईट सवय १६. हस्त १७. वरील दिशा १८. रोकड, नगद १९. नीच माणूस २१. मजा, चंगळ २२. तक्तपोशी, पटई २४. वृद्धी २५. चांगले २६. जसा २८. तराजू २९. निष्णात ३१. वात्सल्य ३२. त्रुटी, कमतरता ३४. पाणी प्यायचे उभट भांडे ३५. बारा वस्तू ३७. आईचा भाऊ ३८. ठेका ३९. खांद्याचा सांधा ४०. व्यापारातील फायदा ४२. आद्य कीर्तनकार ४४. डाग, कलंक ४५. डोशाचा प्रकार ४६. पृथ्वीचा पाण्याने व्यापलेला पृष्ठभाग ४८. पातळ भाजी, आमटी वाढण्याचे साधन ४९. गूढ, खोल ५०. बोचणी, शल्य ५२. नाहक पायपीट ५४. रानात पसरलेली आग ५५. गौरवर्णी ५७. संभव, उत्पत्ती ५८. स्वार्थी ६०. किनारा ६१. कोथिंबिरीच्या बिया ६२. दखल घ्यावी असे ६४. अंतर, फरक ६६. चांदी ६७. वृद्धत्व ६९. युद्धविराम, युद्धबंदीचा करार ७१. ओशाळगत ७३. समज, भान ७४. रास्त ७६. टवाळ, फाजील ७८. खुमारी ७९. आघाताची त्वचेवरील खूण ८०. उसाचा आटवलेला रस ८१. काया ८२. पैशाची थैली ८४. चिलट ८६. देखणा ८८. रांजण ९१. परतफेडीची अपेक्षा न करता देऊन टाकलेले ९४. रानरेडा ९६. संत तुकाराम यांचा अभंग- 'कन्या सासुऱ्याशी जाये मागे परतोनी पाहे, तैसे झाले माझ्या जीवा...' ९७. निरंतर, सतत ९९. बाण १००. शकुन बघण्याची विद्या १०२. प्रामाणिक १०३. माफी १०४. वस्त्र १०५. रात्रीच्या वेळी रानात वाट चुकणे १०६. प्रेरणा, वाटचालीला गती १०७. सारखेपणा

**उभे शब्द –**

१. ज्याची कोणाशी तुलना होऊ शकत नाही असा २. तुरुंग ३. पुराव्यानिशी सिद्ध केलेले ४. विणलेली खाट ५. टोक ६. विनंतीचे पत्र ७. मंजुरी ८. कार्तिकस्वामी १०. विडा रंगवणारा घटक ११. थोरवी १२. द्रवपदार्थ तापवून त्याची वाफ करणे व ती गार करून पुन्हा द्रवरूपात आणणे १३. मृदंग १४. कष्ट १७. झेप २०. भूमी २२. दरवाजा २३. टिंगल २५. सावली २७. खोटारडा ३०. बिनकामाचा, रद्दड ३१. फसवणे, टोपी लावणे ३२. घालमेल, अस्वस्थता ३३. चेहरा ३६. कुर्ता ४०. नूतन ४१. वेगळे होणे ४२. अप्रिय राणी ४३. पाषाण ४७. तांबडा ४८. कलंक ५०. प्रश्नोत्तर ५१. चटकन चपखल प्रत्युत्तर देणारा ५२. ताकीद ५३. प्रचंडगड, वेल्हा तालुक्यातला शिवकालीन किल्ला ५५. पोते ५६. फळभाजी व दह्याचे तोंडीलावणे ५८. सहाय्य ५९. संपत्ती ६१. भूकंप ६३. जखमेतून होणारा रक्तस्राव ६५. शेजारीण ६८. निशा, रजनी ७०. गाजर अथवा दुधी भोपळ्याचा गोड पदार्थ ७१. खलास ७२. कमी वेळात ७५. आसक्तीरहित ७७. पाश्चात्त्य स्नानपात्र ८०. जंगल ८३. तजेला ८५. सातवा वार ८६. वाळलेला ८७. वाजवणे ८९. पृथ्वीच्या पोटातला तप्तरस ९०. लाक्षणिक, सूचक, प्रतिकात्मक ९२. स्वयंचलित वाहनातले इंधन ९३. खात्री, विश्वास ९५. अवाजवी ९६. विष्णू ९७. अग्नी ९८. व्रत १०१. ठोंब्या •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५६८ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. झाडाझडती ४. प्रतिज्ञा ६. कठपुतळी ८. ग्रोस १०. लेक ११. अतिथी १२. सोस १४. मघाशी १६. बकरा १८. मेषपात्र २०. कच्चा २१. परवानगी २३. नामशेष २६. मोद २७. रावा २८. हत २९. घरटे ३१. आततायी ३२. पन्हे ३३. सकस ३५. परस्पर ३६. रथ ३७. स्त्री ३८. वतन ३९. गर्क ४०. शव ४२. हवा ४६. विडी ४८. संपेल ना कधीही हा खेळ सावल्यांचा ५०. अति ५१. खंत ५२. वार ५३. लत ५५. बंड ५६. गुरव ५८. हविर्भाग ५९. पदोपदी ६१. उल्हास ६३. दगा ६५. आतप ६६. रेडकू ६८. गर्व ६९. मलमल ७१. सुंठवडा ७३. जळू ७४. रिवाज ७६. यवस ७७. कैदी ७८. सन ७९. वातड ८२. शिला ८३. कालकूट ८४. दाह ८५. वसाहत ८७. खोड ८८. कासरा ९०. वाम ९२. वावडी ९४. मनन ९६. बहिरा ९७. ईद ९८. गलबत ९९. थकवा

**उभे शब्द :** १. झाले मोकळे आकाश २. डाक ३. डबघाई ४. प्रतिकार ५. तिथी ६. कसब ७. तळ ९. सर्वत्र १३. रोष १५. वनवास १७. कनात १७अ. राम १८. मेष १९. पाखर २१. पदपथ २२. वारा २४. शेजारती २५. शिताफी २८. हसतखेळत २९. घरगडी ३०. टेकू ३४. कव ३६. रवाना ४१. वसंत ४२. हलवा ४३. बधीर ४४. महाभारत ४५. आवली ४६. विचारविनिमय ४७. पतित ४९. कवाड ५०. अलगद ५१. खंक ५४. सुंदोपसुंदी ५५. बंदी ५७. कोल्हा ५९. पत ६०. झुंड ६१. उर्वरित ६२. समज ६४. गाडी ६५. आज्ञा ६६. रेडा ६७. कूजन ७०. लवण ७२. वडीलधारा ७५. वाडवडील ७७. कैलास ७८. सटवाई ७९. वाहवा ८०. सहमत ८१. शिडकावा ८२. शिकारी ८६. तन ८९. राब ९१. मद ९३. बग ९५. नथ

# पार्थ पवारांना कृतघ्न म्हणत काँग्रेसची बोचरी टीका!

पान १ वरून

लागते. त्यामुळे बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध न होण्याबाबत अधिक चर्चा करण्याची गरज नाही, असे स्पष्ट मत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केले आहे.

तर सुप्रिया सुळे म्हणाल्या की, भारतीय राजकारणात आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या उभारणीत काँग्रेस पक्षाचे योगदान अत्यंत मोठे आहे. देशाच्या पंतप्रधानापासून ते ग्रामपंचायतीच्या सरपंचापर्यंत, तसेच महिला आरक्षणापासून ते देशाने जिंकलेल्या युद्धांपर्यंत प्रत्येक टप्प्यावर काँग्रेसची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. हे योगदान कोणालाही नाकारता येणार नाही. भारतातील संविधानाच्या चौकटीत राहून कोणताही पक्ष काम करत असेल, तर आपण लोकशाही मानणारी माणसे म्हणून त्याचा आदर केला पाहिजे. आम्ही सर्वांनी काँग्रेस पक्षाला अत्यंत जवळून पाहिले आहे. मी स्वतः अनेकदा काँग्रेसच्या साथीने निवडणूक लढवून निवडून आले आहे. मी आणि अजित पवार दोघेही काँग्रेसच्याच तालमीत लहानाचे मोठे झालो आहोत. आज आपण जो मोकळा श्वास घेतोय आणि आपल्याला जे स्वातंत्र्य मिळाले आहे, ती काँग्रेसची देण आहे हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही.पार्थ पवारांच्या संदर्भात शरद पवारांनी केलेल्या वक्तव्यावर भाष्य करताना सुळे म्हणाल्या की, कौटुंबिक सल्ले हे घराच्या चार भिंतींच्या आत दिले जातात, ते माध्यमांसमोर जाहीरपणे सांगायचे नसतात. मात्र, जेव्हा घरातील मोठी व्यक्ती काही बोलते, तेव्हा त्यावर प्रतिवाद न करणे किंवा उलट न बोलणे हे आमचे संस्कार आहेत. या विधानातून त्यांनी शरद पवारांच्या भूमिकेचे पूर्णपणे समर्थन केले आहे.

राज्यातील पोटनिवडणुकांच्या मुद्यावर बोलताना सुळे यांनी स्पष्ट केले की, अनेकदा पोटनिवडणुका बिनविरोध होतात, तर कधी त्या लढवल्या जातात. काँग्रेसने यासंदर्भात घेतलेली भूमिका लोकशाहीला धरूनच आहे, त्यात काहीही गैर वाटत नाही. काँग्रेसशी कोणी संपर्क केला की नाही, याबद्दल मला कोणतीही अधिकृत माहिती नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. दरम्यान, पार्थ पवार यांनी काल म्हटले होते की, काँग्रेसला कळायला हवे की ते काय करत आहेत. त्यांच्या राष्ट्रीय नेतृत्वाबाबत मला माहिती नाही, या निर्णयामुळे भविष्यात त्यांना महाराष्ट्रात काय त्रास होईल, हे त्यांना दिसेल, या नंतर काँग्रेस आक्रमक झाले.

# सरकारकडे कोट्यवधींची थकबाकी

पान १ वरून

केली आहेत. या कामांचा थकीत आकडा सुमारे ९६ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. फक्त २० टक्के निधी देण्यात आला असून त्यातीलही बहुतांश रक्कम सीआरएफ आणि इमारत कामांकडे वळवण्यात आली आहे. त्यामुळे इतर कामांसाठी केवळ ८ ते १० टक्केच निधी मिळाला आहे. यामुळे कंत्राटदारांची आर्थिक परिस्थिती गंभीर बनली आहे. या पार्श्वभूमीवर आजपासून महाराष्ट्रातील सर्व ३० जिल्ह्यांत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. त्यामुळे रस्ते, पूल आणि इमारतींची कामे ठप्प होणार आहेत. याबाबत कामगार राज्यमंत्री मंत्री आशिष जयस्वाल म्हणाले की, कंत्राटदारांचे पेमेंट शासनाकडून नियमितपणे दिले जात आहे. नवीन सरकार आल्यापासून नवीन कामांना मंजुरी देण्याऐवजी जुन्या देयकांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे टप्प्याटप्प्याने सर्वांचे पैसे दिले जात आहेत. अर्थसंकल्पामध्ये यासाठी तरतूद करण्यात आली असून, रोख प्रवाह (कॅश इनफ्लो आणि आऊटफ्लो) लक्षात घेऊन राज्यातील विविध विकासकामे आणि योजना राबवण्यात येत आहेत. कृषी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर अर्ज मंजूर करून देयके अदा केली जात आहे.

# आर्टेमिस-२ ने अपोलोचा विक्रम मागे टाकला

पान १ वरून

मैलांचे अंतर पार करून अपोलो-१३ चा विक्रम मागे टाकला.

अवकाशात मानवविरहित यानांनी याहून अधिक अंतर पार केले आहे. मात्र मानवसहित मोहिमेत एवढ्या दूर जाणे धोकादायक आणि प्रचंड जोखमीचे असते.

आर्टेमिस -२ मोहिमेतही काल एक असा टप्पा आला की ओरायन यानाचा तब्बल चाळीस मिनिटांसाठी पृथ्वीशी पूर्णपणे संपर्क तुटला होता. ओरायन यानाने जेव्हा चंद्राच्या पलिकडच्या भागात प्रवेश केला तेव्हा पृथ्वीशी संपर्क ज्या रेडिओ लहरींद्वारे केला जातो त्या रेडिओ लहरी चंद्राचा पृष्ठभाग भेदून पार होऊ शकत नव्हत्या. हे असे होणार हे नासाला अपेक्षित होते.संपर्क तुटलेल्या या ४० मिनिटांत ओरायन यान २ लाख ५२ हजार ७५६ मैलाचा म्हणजेच सुमारे ४ लाख ६ हजार ७७१ किलोमीटर एवढा सर्वाधिक अंतरावर पोहोचले होते.तेथून ते पृथ्वीच्या दिशेने वळले.

ओरायन यानाने गाठलेले हे अंतर आतापर्यंत मानवाने अवकाशात गाठलेले सर्वाधिक अंतर ठरले आहे. हा नवा विक्रम आता आर्टेमिस-२ मोहिमेने प्रस्थापित केला आहे. दहा दिवसांच्या या मोहिमेत रिड वाईजमन, व्हिक्टर ग्लोव्हर आणि ख्रिस्तीना कोच हे तीन नासाचे अंतराळवीर आणि जेरेमी हॅन्सन हे एक कॅनडाचे अंतराळवीर असे एकूण चार अंतराळवीर आहेत. ही चंद्राभोवती प्रदक्षिणा घालणारी म्हणजेच फ्लाय बाय मोहीम आहे. या मोहिमेत अंतराळवीर प्रत्यक्ष चंद्रावर उतरणार नाहीत. तर आगामी चांद्र मोहिमेसाठी महत्त्वपूर्ण माहिती संकलित करून दहा दिवसांनी पृथ्वीवर परतणार आहेत.

१ एप्रिल रोजी केनेडी अवकाश तळावरून नासाच्या स्पेशल लाँच सिस्टीम (एसएलएस) या शक्तिशाली रॉकेटच्या साह्याने ओरायन यान चार अंतराळवीरांना घेऊन आकाशात झेपावले. पृथ्वीची कक्षा पार करताना रॉकेट यानापासून विलग झाले. त्यानंतर ओरायनचा प्रवास चंद्राच्या दिशेने सुरू झाला आहे. या मोहिमेत ओरायन यान चंद्राच्या पृष्ठभागापासून ४ हजार ६७ मैल अंतरापर्यंत जवळ पोहोचले आहेत. तिथून अंतराळवीरांना प्रत्यक्ष डोळ्यांनी चंद्राचा पृथ्वीच्या विरुद्ध दिशेकडील भाग पाहता येईल. तसेच चंद्र सूर्याच्या समोरून जाणार असल्याने सूर्यग्रहणही पाहता येईल.

# इस्त्रायलची इराणींना धमकी! ट्रेनने प्रवास करू नका

पान १ वरून तयार होतो, मी आताही तयार आहे. इराणसाठी माझ्या प्राणांचे बलिदान देण्यास मी यापुढेही तयार राहीन.

ट्रम्प यांच्या धमकीच्या पार्श्वभूमीवर इराणच्या सरकारने नागरिकांना, विशेषतः इराणी तरुणांना, ठरलेल्या वेळी देशातील वीज प्रकल्पांजवळ जमण्याचे आवाहन केले आहे.

इराणच्या उज्ज्वल भविष्यासाठी युवकांची मानवी साखळी या नावाने ही मोहीम राबवण्यात येत आहे. इराणच्या युवा आणि युवा परिषदेचे सचिव अलीरेझा रहिमी म्हणाले की, तरुण, खेळाडू, कलाकार, विद्यार्थी आणि विद्यापीठातील प्राध्यापकांना दुपारी २ वाजता प्रमुख ऊर्जा पायाभूत सुविधांच्या परिसरात एकत्र यावे. या उपक्रमाचा उद्देश राष्ट्रीय पायाभूत सुविधांवर संभाव्य लष्करी हल्ले रोखण्यासाठी नागरिकांची ढाल तयार करणे आहे.

इराणच्या युवक खात्यांचे उपमंत्री अलीरेझा रहीमी म्हणाले की, सार्वजनिक सुविधांवर हल्ला करणे हा युद्ध गुन्हा असल्याचा संदेश देण्यासाठी ही कल्पना स्वतः तरुणांकडून आली आहे. ज्यातून राष्ट्रीय एकतेचे प्रदर्शन घडवण्याचा प्रयत्न आहे.

अमेरिकेने इराणला संपवण्याची धमकी दिली असतानाच इस्त्रायलनेही इराणला आज एक इशारा दिला. एक्सवरील इस्त्रायली लष्कराच्या पर्शियन भाषेतील खात्यावरून इराणी नागरिकांना असे आवाहन करण्यात आले की, त्यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने, इराणच्या वेळेनुसार रात्री ९ वाजेपर्यंत (भारतीय वेळेनुसार रात्री ११ वाजेपर्यंत) संपूर्ण इराणमध्ये ट्रेनने प्रवास करणे टाळावे. ट्रेनमध्ये किंवा रेल्वे मार्गांच्या जवळ असणे तुमच्या जीवासाठी धोकादायक ठरू शकते. इस्त्रायली सैन्याने यासोबत पर्शियन भाषेत एक ग्राफिकही शेअर केले, त्यातही तातडीचा इशारा म्हणून ट्रेन आणि रेल्वे ट्रॅकपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले. यात कोणत्या विशिष्ट भागांचा किंवा रेल्वे मार्गांचा उल्लेख करण्यात आला नव्हता. यावर इशाऱ्यावर इराणच्या अधिकाऱ्यांकडून तत्काळ कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. मात्र, या इशाऱ्यानंतर इराणची चिंता वाढली आहे. त्यानंतर इराणने आपल्या नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्था न वापरण्याचा सल्ला दिला आहे.

### मोजताबा खामेनी बेशुद्धावस्थेत?

इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला खामेनी युध्दात मारले गेल्यानंतर त्यांच्या जागी सर्वोच्च धार्मिक नेतेपदी विराजमान झालेले मोजताबा खामेनी अमेरिकेच्या हल्ल्यात गंभीर जखमी झाले असून ते सध्या बेशुध्दावस्थेत आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घेण्याच्या स्थितीत नाहीत, असा दावा आज करण्यात आला. मोजताबा खामेनी यांच्यावर इराण येथे एका रुग्णालयात सध्या उपचार केले जात आहेत,असे अशी मागणी आहे. अमेरिका आणि इस्त्रायलच्या गुप्तचर यंत्रणांनी अरब राष्ट्रांना जी गुप्त माहिती दिली होती, तिचे विश्लेषण करून मोजताबा यांच्या प्रकृतीबद्दलचे अनुमान लावण्यात आले आहे. अमेरिकेच्या हल्ल्यात आयातुल्ला खामेनी यांच्यासह त्यांच्या परिवारातील काही सदस्यदेखील मारले गेले.तर मोजताबा हे गंभीर जखमी झाले आहेत,असा दावा अमेरिकेने वारंवार केला आहे. मात्र इराणने या वृत्ताचे खंडण केले होते. मात्र, मागील बऱ्याच दिवसापासून मोजताबा एकदाही जगासमोर आलेले नाहीत.त्यांच्या नावाने इराणी प्रसारण यंत्रणा वेळोवेळी निवेदने करत आहे. त्यामुळे मोजताबा सुखरुप आहेत किंवा नाही याबद्दल जगभरात संशय व्यक्त होत आहे.

# अनंत अंबानींची केरळमधील मंदिरांना १२ कोटींची देणगी

कुडाळ

**त्रिशूर –** रिलायन्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक अनंत अंबानी यांनी केरळमधील दोन प्रमुख मंदिरांसाठी मोठ्या देणगीची घोषणा केली आहे. त्यांनी कन्नूर जिल्ह्यातील तलिपरंबा येथील राजराजेश्वरम मंदिर आणि त्रिशूर येथील गुरुवायूर मंदिरासाठी प्रत्येकी ३ कोटी रुपयांची देणगी दिली आहे.

# खरात प्रकरणी १२ गुन्हे ३० साक्षीदार तपासले

पान १ वरून

तपासादरम्यान ३० पेक्षा अधिक साक्षीदारांची विचारपूस केलेली आहे. खरात पीडित व्यक्ती आणि कुटुंबाच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत होता, त्यांना भीती दाखवत होता. खडे,चिंचोके, रुद्राक्ष, पूजा विधि इत्यादी गोष्टींच्या माध्यमातून त्यांच्याकडून पैसा उकळत होता. महिलांना स्वतः कडे दैवी शक्ती असल्याचे भासवत होता. त्यांच्या कुटुंबीयांच्या मृत्यूची भीती दाखवून त्यांना बदनामी करण्याची धमकी देऊन त्यांचं लैंगिक शोषण करत होता, असे आढळले आहे या प्रकरणाच्या एकूण ४,६५० लिंक एसआयटीच्या सायबर टीमने शोधून काढल्या आहे. त्यांनी डिलीट करून आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या एकूण ४५१ अकाउंटला कायमस्वरूपी काढून टाकले आहे.

# २०२८ पर्यंत मेट्रो जाळे पूर्ण करणार

पान १ वरून

दिलासा मिळणार आहे. ठाणे ते बोरिवली हा ११.८४ किमी लांबीचा भुयारी मार्ग तयार झाल्यानंतर हा प्रवास केवळ १५ मिनिटांत पूर्ण होणार आहे. या प्रकल्पांतर्गत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखाली दोन समांतर बोगदे बांधले जाणार आहेत. बीकेसी ते कुर्ला दरम्यान ३.३६ किमी लांबीच्या मार्गावर पॉड टॅक्सी प्रकल्पाचे ई-भूमिपूजनही करण्यात आले. या मार्गावर ८ स्थानके असणार असून लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.


पॉड टॅक्सी प्रकल्पाच्या भूमिपूजनानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मेट्रो जाळ्याच्या विस्तारामुळे सुमारे ७० लाख प्रवाशांची अतिरिक्त वाहतूक क्षमता निर्माण होईल आणि उपनगरी रेल्वेवरील ताण कमी होईल. मुंबईतील मेट्रो नेटवर्क आता संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशापर्यंत विस्तारत आहे आणि दुसरा टप्पाही याच वर्षी पूर्ण होणार आहे.लास्ट माईल कनेक्टिव्हिटीसाठी एक पथदर्शी प्रकल्प सुरू केला आहे. मेट्रो किंवा लोकलने आलेल्या प्रवाशांना पुढे दुसरे वाहतूक साधन घेण्याची गरज भासणार नाही. पॉड टॅक्सी प्रकल्पासाठी सर्व आवश्यक परवानग्या मिळाल्या असून, कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास ती तातडीने कळवावी. हा प्रकल्प २० महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आजचा दिवस मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशच्या (एमएमआर) दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मुंबई आणि एमएमआरमधील वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीने आजचा दिवस ऐतिहासिक ठरणार आहे. पूर्व-पश्चिम आणि उत्तर-दक्षिण मुंबईला जोडणाऱ्या मेट्रोला हार्बर लाईनशी पहिली कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. यामुळे मेट्रो-१, मेट्रो-३, मेट्रो-४, पश्चिम रेल्वे, मोनोरेल आणि हार्बर लाईन यांच्याशी थेट जोडणी होईल.२०२२ पासून महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर मुंबई, एमएमआर आणि महाराष्ट्रात अनेक महत्त्वाचे प्रकल्प आणि विकासकामे पूर्णत्वास जात आहेत. यामुळे राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळत आहे.

# डिजिटल महाराष्ट्रासाठी मोठे पाऊल
## नवा आयटी-एआय विभाग स्थापन

मुंबई

**राज्यात** इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या क्षेत्रांना चालना देण्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने आज मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. विकसित भारत २०४७ अंतर्गत विकसित महाराष्ट्राचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. या नव्या धोरणाअंतर्गत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे रुपांतर इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय




म्हणून करण्यात येणार आहे. तसेच मंत्रालयीन विभाग, आयुक्त कार्यालय आणि सर्व जिल्ह्यांसाठी कायमस्वरूपी पदांचा समावेश असलेला स्वतंत्र माहिती तंत्रज्ञान संवर्ग तयार करण्यात येणार आहे.

या निर्णयामुळे राज्यातील माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल गव्हर्नन्स क्षेत्राला मोठी गती मिळण्याची अपेक्षा आहे.

**PUBLIC NOTICE**

THIS IS TO BRING TO THE NOTICE OF PUBLIC AT LARGE THAT my client, Adarsh Bal Mandir, a Public Charitable Trust is looking out for the Order bearing No. D.D.c's No. TAR/S.R 724 dated 27th November, 1963, whereby possession of 1,000 sq. yards of land from CTS Nos. E/30 and E/31 of "E" Ward, Village Bandra, Taluka Andheri, MSD was handed over to them on 3rd December, 1963. My Client does not have the said Document, despite of their best efforts and diligent search to find the same.

All person/s at large are called upon to inform the undersigned in the event if they find the above document within 14 days from the publication of this Notice.

**Dated this 8th day of April, 2026.**

**Adv. Rumi Mirza,**
Office No.6, 2nd floor, 29, Rustom Building,
Veer Nariman Road, Fort, Mumbai - 400 023.
Email: rumi@rhmlegal.com

SBI-SG
One Stop Solution For All Investments
**SBI-SG GLOBAL SECURITES SERVICES PVT LTD**
B Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) building, SVP Road, Santacruz - W, Mumbai - 400054, Maharashtra, India

**TENDER NOTICE**

Chief Financial Officer, SBI-SG Global Securities Services Pvt Ltd, B Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) building, SVP Road, Santacruz - W, Mumbai - 400054, Maharashtra, India invites sealed bids from eligible bidders to meet the requirement of **APPOINTING CONCURRENT AUDITOR FOR CONCURRENT AUDIT VERIFICATION FOR MUTUAL FUND CLIENTS OF SBI-SG GLOBAL SECURITIES SERVICES PVT. LTD** as per requirement mentioned in RFP number: **RFP/FA/25-26/1157**. The complete set of bidding documents can be downloaded from our website **https://www.sbisgcsl.co.in/statutory/** "TENDER" section. Complete set of bidding documents may be submitted in sealed envelopes on or before 14-04-2026 by 11:30 pm at our registered office.

S/d
**(Amitav Kar)**
**Chief Financial Officer**

नवाकाळ




# जम्मू-काश्मीरमधील ५१८ तलाव गायब



**श्रीनगर -** जम्मू आणि काश्मीर 'कॅग'ने जारी केलेल्या अहवालातून धक्कादायक वास्तव समोर आले आहे. राज्यातील ५१८ तलाव एकतर पूर्णपणे नामशेष झाले आहेत किंवा त्यांची अवस्था पुनरुज्जीवित करण्यापलिकडे गेली आहे, असे 'कॅग'च्या अहवालात म्हटले आहे. 'कॅग'ने सन १९६७ ते २०२० या कालावधीतील राज्यातील ६९७ तलावांचे सर्वेक्षण केले. त्यातून हे धक्कादायक चित्र स्पष्ट झाले आहे. हा पर्यावरणासाठी फार मोठा धोका आहे, असा इशारा 'कॅग'ने अहवालातून दिला आहे.

## ठाण्यातील उन्नत मार्गासाठी ३१ कांदळवन वृक्ष तोडणार



हायकोर्टाची परवानगी

■ मुंबई

**ठाण्यातील** साकेत ते आनंदनगरदरम्यान उभारल्या जाणाऱ्या एलिव्हेटेड मार्गाला मुंबई हायकोर्टाने परवानगी देताना तेथील ३१ कांदळवन वृक्ष तोडण्याची परवानगी दिली आहे. त्या मोबदल्यात त्याच्या १० पटीने म्हणजेच ३१० झाडे ठाण्यातील कोपरी भागात लावण्यात आली आहेत, अशी माहिती कांदळवन कक्ष (मॅंग्रोव्ह सेल) च्या वतीने काल मुंबई हायकोर्टात देण्यात आली. राज्यात कुठेही कांदळवनाची तोड करणे हा दखलपात्र गुन्हा आहे. त्याकरता थेट मुंबई हायकोर्टाची पूर्वपरवानगी असणे अनिवार्य आहे.

३१० कांदळवन झाडे लावण्यात आली असल्याची नोंद घेत हा प्रकल्प सार्वजनिक हिताचा असल्यामुळे तो रोखता येणार नाही, असे स्पष्ट करत मुंबई हायकोर्टाने यासंदर्भातील याचिका निकाली काढली. या याचिकेवर काल न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. एमएमआरडीएला ठाण्यातील इस्टर्न एक्स्प्रेस हायवेवर आनंदनगर ते साकेत दरम्यान ६ मार्गिकांचा उन्नत मार्ग म्हणजेच एलिव्हेटेड रोड बांधायचा आहे. हा प्रकल्प सार्वजनिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून यामुळे मुंबई सहउपनगरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. या प्रकल्पासाठी ०.२१४५ हेक्टर कांदळवन जमिनीचा वापर करावा लागणार आहे.

## दिंडोरी विहीर अपघात प्रकरणी चौकशी समिती

■ दिंडोरी

**दिंडोरी** तालुक्यातील भीषण विहीर अपघात प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी पाच सदस्यीय चौकशी समिती नियुक्त केली असून समितीला सात दिवसांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या दुर्दैवी घटनेत दरगोडे कुटुंबातील ६ शालेय विद्यार्थ्यांसह एकूण ९ जणांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर अपघाताची सखोल चौकशी करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. समितीला संबंधित ठिकाणची प्रत्यक्ष परिस्थिती, कामाची पद्धत, सुरक्षा उपाययोजना तसेच प्रशासनिक जबाबदाऱ्या यांचा तपशीलवार आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## आंबा-काजूला तुटपुंजी मदत कोकणातील शेतकऱ्यांची थट्टा



■ मुंबई

**अवकाळी** पाऊस आणि हवामान बदलामुळे कोकणात आंबा व काजूचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीबद्दल राज्य सरकारने देऊ केलेली सरासरी प्रति झाड १०० ते २०० रुपयांची मदत अत्यंत तुटपुंजी असून कोकणातील शेतकऱ्यांची थट्टा करणारी आहे. त्यामुळे राज्य सरकारने हेक्टरी किमान दोन लाख रुपयांची मदत जाहीर करावी, अशी मागणी जनता दल सेक्युलर पक्ष व कोकण जनविकास समितीने केली आहे.

आंबा व काजू पिकाच्या झालेल्या नुकसानीबद्दल हेक्टरी २२ हजार रुपये देण्याची घोषणा राज्य सरकारने नुकतीच विधिमंडळ अधिवेशनात केली आहे. हेक्टरी आंब्याची किमान १०० झाडे बसतात तर काजूची २१५ ते २२० झाडे बसतात. या हिशोबाने विचार केल्यास राज्य सरकारने प्रति झाड आंब्याला २२५ रुपये तर काजूला १०० रुपये मदत देऊ केली आहे. ही मदत तुटपुंजी असून झाडामागे मिळू शकणाऱ्या उत्पन्नाच्या १० टक्केही नसल्याचे जनता दल सेक्युलर मुंबई पक्ष, कोकण संघटक तसेच कोकण जनविकास समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. तत्कालीन शिवसेना भाजपा युती सरकारने १९९५-९६ च्या सुमारास आंबा पिकाचे नुकसान झाल्याबद्दल हेक्टरी १०० कलमे धरल्यास शेतकऱ्यांना झाडामागे १०० रुपये मिळाले होते.

## अंजनगाव पुतळा प्रकरणात आवारे पाटील कोठडीत

पुतळे बनवण्याचा कारखाना सील

■ सोलापूर

**माढा** तालुक्यातील अंजनगाव खेलोबा येथे रात्रीतून महापुरुषांचा पुतळा बसवण्याच्या घटनेमुळे दोन समाजांमध्ये तणाव निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी दोन्ही गटांतील शेकडो लोकांवर आठ गंभीर गुन्हे दाखल केले आहेत. तसेच अंजनगाव येथील बेकायदेशीर पुतळा प्रकरणी शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांना न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. याचबरोबर जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील चार्मापुरी येथील आवारे पाटील यांचा पुतळे बनवण्याचा कारखाना सील करण्याचे आदेश उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले आहेत. गायरान जमिनीवर कृषी अवजारे तयार करण्याच्या नावाखाली जमीन घेऊन त्या ठिकाणी अनधिकृतपणे पुतळे तयार करण्याचा कारखाना सुरू केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. तसेच चिथावणीखोर भाषणे करत विविध ठिकाणी पुतळे बसवण्यास प्रवृत्त केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. आवारे पाटील यांच्या सोशल मीडियावरील 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज शौर्य प्रतिष्ठान' या पेजवरून मध्यरात्री पुतळे कसे बसवले जातात, याचे व्हिडिओ प्रसारित केले जात असल्याची माहिती समोर आली आहे.

शेरवर रामबिलास मुंदडा, राज्यमंत्री तथा अध्यक्ष, महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या अध्यक्षतेखाली तसेच नाथपंथी डवरी गोसावी समाजाचे नेते मच्छिन्द्र भोसले यांच्या मार्गदर्शनानुसार आणि नाथपंथी डवरी गोसावी गोसेवा संस्था, महिला अध्यक्ष कल्पना चव्हाण व कृष्णा शिंदे यांच्या पुढाकाराने दादर येथील मराठी पत्रकार संघ येथे गायींच्या प्रश्नांबाबत एक अत्यंत महत्त्वपूर्ण पत्रकार परिषद पार पडली.




या पत्रकार परिषदेमध्ये गायींवर आधारित उदरनिर्वाह करणाऱ्या आपल्या समाजातील महिलांच्या जीवनातील वास्तव परिस्थिती, त्यांना भेडसावणाऱ्या अडचणी, प्रशासनाकडून येणाऱ्या अडथळ्यांबाबत तसेच त्यांच्या हक्कांच्या प्रश्नांवर सखोल आणि मुद्देसूद चर्चा करण्यात आली. अनेक ठिकाणी या महिलांना बसण्यास, गायी ठेवण्यास किंवा चारा देण्यास अडचणी येत असल्याने त्यांच्या उपजीविकेवर परिणाम होत आहे, हे मुद्दे ठळकपणे मांडण्यात आले. या महिलांना न्याय मिळावा, त्यांच्या पारंपरिक व्यवसायाचे संरक्षण व्हावे आणि त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी शासनस्तरावर योग्य ती पावले उचलण्याची गरज अधोरेखित केली.

## अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ मदत देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

■ मुंबई

**राज्यात** झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची गंभीर दखल घेत मंत्रिमंडळ बैठकीत शेतकऱ्यांच्या मदतीला प्राधान्य देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत देण्याचे निर्देश देण्यात आले.

मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश देताना सांगितले की, ज्या भागांमध्ये पावसामुळे पिकांचे नुकसान झाले आहे, त्या ठिकाणी लवकरात लवकर पंचनामे करावेत. नुकसानाचा अचूक अंदाज घेऊन शेतकऱ्यांना मदत मिळावी, यासाठी प्रशासनाने विलंब न करता कार्यवाही करावी. नुकसानभरपाई एनडीआरएफच्या निकषांनुसार देण्याचाही निर्णय या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या नियमांनुसार आर्थिक मदत दिली जाणार आहे. प्राथमिक अहवालानुसार, अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका फळबागांना बसला आहे. आंबा, द्राक्षे, डाळिंब यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे या पिकांसाठी विशेष लक्ष देऊन मदत देण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

## रॉकेट हल्ल्यात २ मुलांचा बळी मणिपुरात पुन्हा हिंसक निदर्शने

■ इम्फाळ

**राज्यातील** बिष्णुपूर जिल्ह्यात कथित रॉकेट हल्ल्यात आज दोन मुले मृत्युमुखी पडले. त्यानंतर पाच जिल्ह्यांत हिंसक निदर्शने सुरू झाली असून परिस्थिती आणखी चिघळू नये, म्हणून राज्य सरकारने आज पाच जिल्ह्यांमध्ये तीन दिवसांसाठी इंटरनेट सेवा आणि मोबाईल डेटा सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला.

आज सकाळी एका घरावर झालेल्या रॉकेट हल्ल्यात पाच महिन्यांची एक मुलगी आणि पाच वर्षांचा एक मुलगा गंभीर जखमी झाला. उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या हल्ल्यात या मुलांची आईदेखील जखमी झाली आहे.

### इंटरनेट सेवा बंद

या घटनेचे वृत्त कळताच मोठ्या संख्येने लोक रस्त्यांवर उतरले. तेलाच्या टँकरना आगी लावण्यात आल्या. कुकी बंडखोरांनी हा रॉकेट हल्ला केला, असा त्यांचा आरोप होता. बघता बघता पाच जिल्ह्यांमध्ये या घटनेचे तीव्र पडसाद उमटले. लोक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली. त्यामुळे अफवांवर आळा घालण्यासाठी राज्य सरकारने इंटरनेट बंदीचे आदेश दिले आहेत.

## पुण्यात टँकरची धडक तरुणीचा जागीच मृत्यू

■ पुणे

**पुणे** व पिंपरी-चिंचवड परिसरात अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच आणखी एक अपघात घडला आहे. पुण्यात टँकरच्या धडकेत एका तरुणीचा जागीच मृत्यू झाला. ही घटना पुण्यातील राहीजा गार्डन्स परिसरातून पुणे कॅन्टोन्मेंटकडे जाणाऱ्या पुलाजवळ घडली. रस्ता ओलांडत असलेल्या तरुणीला टँकरने जोरदार धडक दिली. या अपघातात तिचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर घटनास्थळी मोठी गर्दी जमली. त्यानंतर पोलिसांनी टँकर चालकाला ताब्यात घेतले.

## मेट्रो ४ पॅरापेट दुर्घटनेप्रकरणी आणखी दोघांना जामीन मंजूर

■ मुंबई

**मुलुंड** येथील मेट्रो मार्गिका ४ च्या कामादरम्यान झालेल्या पॅरापेट दुर्घटनेप्रकरणी सत्र न्यायालयाने काल आणखी दोन आरोपींना जामीन मंजूर केला. या प्रकरणात जामीन मिळालेल्या दोन आरोपींमध्ये उपव्यवस्थापक सौरभ सिंह आणि सुपरवायझर प्रशांत भोईर यांचा समावेश आहे. न्यायालयाने यापूर्वीच मागील आठवड्यात डीबी हिल एसबीजी कंपनीचे प्रकल्प संचालक हरीश चौहान, प्रकल्प व्यवस्थापक कुलदीप सपकाळ आणि अवधूत इनामदार या तिघांना जामीन मंजूर केला होता.

गेल्या आठवड्यात तिघांना जामीन देताना न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले होते की, ही दुर्घटना वेल्डरच्या चुकीमुळे घडली आहे. हा अपघात अचानक घडला असून वेल्डरने त्याच्या वरिष्ठांच्या सूचनांचे पालन न केल्याने ही घटना घडल्याचे न्यायालयाने नमूद केले होते. १४ फेब्रुवारी रोजी काँक्रीटचा एक मोठा भाग चालत्या वाहनांवर कोसळून झालेल्या या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता, तर तीन जण जखमी झाले होते.

## शिंदे यांच्या संकल्पनेतील 'आपला दवाखाना' आजारी

■ मुंबई

**तत्कालिन** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना आणली. मात्र आता 'आपला दवाखाना' आजारी पडला आहे. औषधांची कमतरता, सफाई, वीज, पाणी या सुविधांचा अभाव या महत्त्वपूर्ण गोष्टींकडे लक्ष वेधत उबाठाचे नगरसेवक सचिन पडवळ यांनी पालिका प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे.




एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना मुंबईकरांसाठी आपला दवाखाना योजनेची घोषणा केली. केईएम, नायर, सायन, कूपर या रुग्णालयांवरील ताण कमी करण्यासाठी आणि लोकांना घराजवळ उपचार मिळावे, यासाठी शिंदे यांनी बाळासाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त आपला दवाखाना योजना अंमलात आणली. मात्र तीन वर्षांत 'आपला दवाखान्या'त डॉक्टरांची कमतरता, मनुष्यबळ औषधांचा अभाव असल्याने रुग्णांची परवड होत आहे. आपल्या दवाखान्यातील समस्यांचे निवारण करण्यात समिती स्थापन करण्यात यावी, अशी मागणी सचिन पडवळ यांनी ठरवाच्या सूचनेद्वारे केली आहे. येत्या ९ एप्रिल रोजी सभागृहात ठरावाची सूचनेवर चर्चा होणार आहे.




दहिसर (पूर्व) ते काशिगाव (पूर्व) मेट्रो मार्गिकेचे लोकार्पण आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी भाजपा गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यावेळी महापौर रितू तावडे, नगरसेवक प्रकाश दरेकर आणि आदी मान्यवर उपस्थित होते.

## पवन खेरा यांच्या दिल्लीतील घराची पोलिसांकडून झडती



■ नवी दिल्ली

**आसामचे** मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नीने दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आसामच्या पोलिसांनी आज काँग्रेसचे प्रवक्ते आणि माध्यम विभागाचे प्रमुख पवन खेरा यांच्या दिल्लीतील घराची झडती घेतली.

आसाम विधानसभेची निवडणूक तोंडावर आली आहे. त्यामुळे प्रचारात एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांना ऊत आला आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर पवन खेरा आणि काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी ५ व ६ एप्रिल रोजी पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नी रिनिकी भुयान सरमा यांच्याकडे यूएई, अँटिग्वा आणि इजिप्त अशा तीन देशांचे पासपोर्ट आहे. सरमा यांच्या कुटुंबाच्या नावावर दुबईत आलिशान मालमत्ता आहे. तसेच अमेरिकेतील व्योमिंगमध्ये एक कंपनी आहे. या मालमत्तांचा उल्लेख सरमा यांनी निवडणूक आयोगाकडे सुपूर्द केलेल्या शपथपत्रात केलेला नाही, असा आरोप खेरा यांनी केला होता. तसेच निवडणुकीत पराभव झाल्यास सरमा कुटुंबीय विदेशात पळून जाण्याच्या तयारीत आहे, असाही दावा काँग्रेसने केला होता. खेरा आणि गोगोई यांच्या या आरोपांमुळे आसामच्या राजकारणात खळबळ उडाली. मुख्यमंत्री सरमा आणि त्यांच्या पत्नी रिनिकी यांनी खेरा आणि गोगोई यांचे आरोप खोडून काढले. हे आरोप खोडसाळ, धादांत खोटे आणि राजकीय हेतूने प्ररित आहेत, असा दावा त्यांनी केला. त्यानंतर काल रिनिकी यांनी पवन खेरा यांच्याविरूद्ध बदनामी केल्याची तक्रार नोंदवली.

## शेअर बाजारात पुन्हा घसरणीनंतर तेजी

■ मुंबई

**भारतीय** शेअर बाजारात आज सलग दुसऱ्या दिवशी सकाळी घसरण आणि दुपारनंतर तेजी दिसून आली. सकाळी घसरणीच्या दबावाखाली असलेल्या शेअर बाजाराने दुपारनंतर जोरदार पुनरागमन केले. निफ्टी आणि सेन्सेक्स या दोन प्रमुख निर्देशांकांनी सलग चौथ्या दिवशी तेजीचा कल कायम राखला. सेन्सेक्सने ५५० अंकांची वाढ नोंदवत ७४,६०० चा स्तर गाठला. तर निफ्टीने २३,१०० चा महत्वाचा टप्पा ओलांडला. मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांतही अर्ध्या टक्क्याची वाढ झाली. संध्याकाळी बाजार बंद होताना सेन्सेक्स, निफ्टी वाढीसह स्थिरावला.

## रायगडमधील मच्छीमार आंदोलनाच्या पवित्र्यात

### इंधन दरवाढीचा फटका शेकडो बोटी बंदरात

**जागतिक स्तरावर सुरू असलेल्यासंघर्षाचासर्वाधिक फटका रायगडमधील उरण तालुक्यातील मच्छिमारांना बसला आहे. इंधनाचा तुटवडा आणि डिझेलच्या गगनाला भिडलेल्या किमतींमुळे मासेमारी व्यवसाय पूर्णपणे कोलमडण्याच्या उंबरठ्यावर आहे. मोरा व करंजा यांसारख्या गजबजलेल्या बंदरांमध्ये आज शुकशुकाट असून शेकडो बोटी किनाऱ्यावर उभ्या आहेत.**

■ उरण

**मच्छिमारांनी** मागण्या केल्या आहेत की, १. मच्छिमारांसाठी स्वतंत्र कोट्यातून डिझेल पुरवठा करावा.,२. डिझेल दरात तातडीने अनुदान किंवा सवलत मिळावी., ३. मासेमारीसाठी आवश्यक इंधनाची हमी सरकारने द्यावी.,४. झालेल्या आर्थिक नुकसानाची भरपाई मिळावी. ५ शासनाकडून मिळणाऱ्या डिझेलमध्ये ५० टक्क्यांनी घट करण्यात आली आहे. येत्या आठ दिवसांत योग्य निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल,असा इशारा करंजा मच्छीमार विकास सोसायटीचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी केला आहे.



मासेमारीसाठी डिझेल हा मुख्य घटक आहे. एका मोठ्या मासेमारी फेरीसाठी हजारो लिटर डिझेलची आवश्यकता असते. मात्र, सध्या डिझेलचा पुरवठा मर्यादित होत असून अनेक ठिकाणी केवळ १०० लिटरची मर्यादा घालण्यात आली आहे.

## मुंबई सेंट्रलच्या प्लॅटफॉर्मच्या कामासाठी ६० दिवसांचा ब्लॉक

■ मुंबई

**मुंबई** सेंट्रल रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वरील कामासाठी पश्चिम रेल्वे प्रशासनाने ६० दिवसांचा मेगाब्लॉक जाहीर केला आहे. हा ब्लॉक तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आला. त्यामुळे लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वर संपूर्ण रुळ नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे.




या कामासाठी पुढील दोन महिने ब्लॉक लागू राहणार असून गाड्यांच्या वेळापत्रकात महत्त्वाचे बदल करण्यात आले. यामुळे परराज्यातून मुंबईत येणाऱ्या काही एक्स्प्रेस गाड्यांचा प्रवास मुंबई सेंट्रलऐवजी दादर स्थानकातच समाप्त करण्यात येत आहे. पश्चिम रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, पुढील आदेश मिळेपर्यंत काही गाड्यांचा प्रवास दादर येथे करण्यात संपणार आहे. यामध्ये ओखा-मुंबई सेंट्रल सौराष्ट्र मेल, हजरत निजामुद्दीन-मुंबई सेंट्रल एक्स्प्रेस (बुधवार व रविवार), कानपूर अन्वरगंज-मुंबई सेंट्रल एक्स्प्रेस (मंगळवार) व काठगोदाम-मुंबई सेंट्रल एक्स्प्रेस (शुक्रवार) या गाड्यांचा समावेश आहे.